अस्सल सोलापुरी

सुराज्य
सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार दि. ३१ ऑक्टोबर २०२२ | वर्ष : २१ वे | अंक : ३४ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

कोरोना विषाणू हवेतून पसरतो

सुराज्य/नवी दिल्ली : संपूर्ण जगाला वेठीस धरणारा कोरोना विषाणू हवेतून पसरत असल्याचं संशोधन समोर आलं आहे. तसंच, जागतिक आरोग्य संघटनेनेही या संशोधनालाही पुष्टी दिली आहे.



कोरोना हा संसर्गजन्य रोग असल्याने तत्काळ पसरत जातो. त्यामुळे चीनमधील या विषाणूने संपूर्ण जगात धुमाकूळ माजवला होता. अशाच एका संशोधनातून कोरोना विषाणू हवेतून पसरत असल्याचं सिध्द झालं आहे. हवेतील लहान कणांचा अभ्यास करणारे शास्त्रज्ञ लिन्सी मार यांनी त्यांच्या टीमसह हे संशोधन केले आहे. जागतिक आरोग्य संघटनेनेही या अहवालाला पुष्टी दिली आहे. त्यामुळे कोरोना विषाणू हवेतून पसरत असल्याची माहिती जागतिक आरोग्य संघटनेने संकेतस्थळावरही प्रसिध्द केली आहे.

सांगवीत वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू

सुराज्य/अक्कलकोट : अक्कलकोट-वागदरी महामार्गावरील सांगवी येथील मुख्य चौकात रस्ता ओलांडत असताना अज्ञात वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू झाला.

ही घटना दि. २९ रोजी रात्री साडेदहा वाजता घडली. रजाक मोहम्मद शेख (वय ३१ रा. सांगवी बु.) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. अक्कलकोट ते वागदरी जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील सांगवी बुद्रुक येथील बस थांब्याजवळ शेख हे रस्ता ओलांडत असताना अज्ञात वाहनाने जोरात धडक दिली. यात डोक्याला जबर मार लागून त्यांचा मृत्यू झाला. अज्ञात वाहनधारकाच्या विरुध्द फिर्यादी अमीर मौला शेख यांनी अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत पुजारी हे करीत आहेत.

राजन मालकांनी अखेर 'दांडपट्टा' फिरवला, मनात दडलेला भाजपचा 'हुंदका' उफाळला

अकलूजकरांच्या लाल दिव्यासाठी 'विडा'ही उचलला

सुराज्य/सोलापूर

गेल्या काही महिन्यांपासून मोहोळ माजी आमदार राजन (मालक) पाटील यांच्या भाजप प्रवेशाचा निर्णय तळ्यात-मळ्यात आहे. प्रवेशाच्या वावड्या इतक्या उठल्या की, मालकांनी त्याचा इन्कार केला नाही वा खुलासाही केला नाही. मात्र त्यांच्या मनात भाजपप्रेम दडलेले होते हेही लपून राहिलेले नव्हते. अखेर अखेर त्यांनी हृदयात साठलेल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. त्यातून त्यांच्या मनात दडलेले भाजपप्रेम उफाळून आले. भाजप समर्थक आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांचा सोलापूर जिल्ह्यातील संपर्क कमी झाला आहे, तो त्यांनी वाढवावा, अशी अपेक्षा व्यक्त करतानाच मालकांनी त्यांना लाल दिव्याची गाडी मिळावी म्हणून चक्क दंडही थोपटले. बीजेपीत माझे ऐकणारे आहेत, असा निर्वाळा दिल्यामुळे मालक भाजपच्या उंबरठ्यावर आहेत, हे स्पष्ट झाले आहे.

मोहोळ तालुक्यातील पापरी येथे एका विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी अध्यक्षपदावरून मालक बोलत होते. सोलापूर जिल्हा अगोदर राष्ट्रवादीमय होता, तो आता कमी झाला आहे. आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांना लाल दिव्याची गाडी मिळावी, त्याच्यासाठी आम्ही वकिली करू; कारण भाजपमध्ये आमचेही ऐकणारे कोणीतरी आहेत, असे सांगून मालकांनी आपले भाजपमधील वजन प्रवेशाआधीच अधोरेखित केले.

वैमानिक झाल्याबद्दल ऋतुजा राजन पाटील, रयत शिक्षण संस्थेच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल डॉ. बाबासाहेब देशमुख, अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सिनेट सदस्यपदी निवड झाल्याबद्दल अजिंक्यराणा पाटील या तिघांचा पापरी ग्रामस्थ, ग्रामपंचायत पापरी व भोसले कुटुंबीय यांच्या वतीने येथे नागरी सत्कार करण्यात आला.

जिल्ह्यासाठी प्रेरणा

आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यावेळी बोलताना म्हणाले की, आजच्या सत्कारमूर्ती या जिल्ह्याच्या प्रेरणा आहेत. ऋतुजा राजन पाटील या महिला वैमानिक झाल्याने महिलांचा स्वाभिमान वाढला आहे. जिल्ह्याच्या अडचणी सोडवण्यासाठी मी जरूर प्रयत्न करेन. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे विकासासाठी माहीर आहेत. महिला सक्षमीकरणासाठी सहकार्य करू.

मालक म्हणाले, 'जिल्ह्याच्या विकासात व जडणघडणीत सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील, (स्व.) गणपतराव देशमुख यांचे मोठे योगदान आहे. आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांचा सोलापूर जिल्ह्यातील संपर्क कमी झाला आहे, तो त्यांनी वाढवावा.

स्वप्न सत्यात उतरवले...

ऋतुजा पाटील म्हणाल्या, मी शाळेत असताना जे स्वप्न पाहिले होते ते सत्यात उतरविले. तुम्हीही तुमच्या मुलींना संधी द्या. या माझ्या स्वप्नाचे सर्व श्रेय आजी आजोबा, आई-वडील व भावांना जाते. या वेळी अजिंक्यराणा पाटील, नाना डोंगरे, प्रकाश चवरे, डॉ बाबासाहेब देशमुख, संगीता सावंत यांची भाषणे झाली. या वेळी प्रकाश कस्तुरे, पोपट देशमुख, भाजप युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष रणजीत चवरे, सरपंच जयश्री शंकर कोळी, उपसरपंच अमोल भोसले, रमेश कचरे, वैभव गुंड, रामदास चवरे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी आमदार यशवंत माने म्हणाले की, शिंदे-फडणवीस सरकारने मोहोळ तालुक्याचा १३० कोटींचा विकास निधी आडविला आहे, तो मिळण्यासाठी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी प्रयत्न करावा.

भारताला मोठा धक्का; संघ लढला पण तरीही हरला...

सुराज्य/पर्थ

भारताला या विश्वचषकात हा पहिला धक्का बसला आहे. भारतीय संघाच्या धावा कमी असल्या तर गोलंदाजांनी चांगला किल्ला लढवला होता, पण तरीही भारताला पराभवाचा सामना करावा लागला.

सूर्यकुमार यादवच्या अर्धशतकाच्या जोरावर भारताला १३४ धावांचे आव्हान दक्षिण आफ्रिकेपुढे ठेवता आले होते. त्यानंतर भारताच्या गोलंदाजांनी सुरुवातीच्या काही षटकांमध्ये अचूक मारा केला आणि दक्षिण आफ्रिकेच्या धावसंख्येला खीळ बसवली होती. पण त्यानंतर एडन मार्करम आणि डेव्हिड मिलर यांनी अर्धशतके झळकावत दक्षिण आफ्रिकेचा विजय सुकर केला.

भारताचे १३४ धावांचे आव्हान माफ वाटत असले तरी भारताच्या गोलंदाजांनी सुरुवातीला कमाल केली. अर्शदीप सिंगने पहिल्याच स्पेलमध्ये दोन विकेट्स घेतले तर भुवनेश्वर कुमारने पहिला स्पेल भन्नाट टाकला. त्यानंतर मोहम्मद शमीनेही दमदार गोलंगादी करत दोन षटकांमध्ये फक्त चार धावा देत एक विकेटही मिळवला होता. पण त्यानंतर एडन मार्करम आणि डेव्हिड मिलर यांनी दमदार भागीदारी रचली आणि संघाच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला. मार्करमने यावेळी ३९ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. पण अर्धशतक झळकावल्यावर मात्र तो लगेच बाद झाला. हार्दिक पंड्याने मार्करमला ५२ धावांवर असताना बाद केले. दक्षिण आफ्रिकेच्या लुंगी एनगिडीच्या गोलंदाजीवर भारतीय फलंदाजांची त्रेधा उडाली होती. लुंगीने चार विकेट्स घेत भारताचे कंबरडे मोडले होते. पण भारतीय फलंदाजांच्या लुंगी डान्सनंतर सूर्यकुमार यादव चांगलाच तळपला आणि त्यामुळेच भारताला यावेळी आव्हानात्मक धावसंख्या उभारता आली. सूर्याने यावेळी ३० चेंडूंत आपले अर्धशतक साकारले. त्यानंतरही सूर्याने धडाकेबाज फटकेबाजी केली. सूर्याने या सामन्यात फक्त ४० चेंडूंत सहा चौकार आणि तीन षटकारांच्या जोरावर ६८ धावा केल्या. भारताचा सूर्या हा असा एकच फलंदाज ठरला की ज्याला मोठी खेळी साकारता आली. त्यामुळे भारताला दक्षिण आफ्रिकेपुढे १३४ धावांचे सन्मानजनक आव्हान ठेवता आले. या सामन्यात भारताला एकामागून एक धक्के बसत गेले. रोहित शर्माच्या रूपात भारताला पहिला धक्का बसला, त्याला १५ धावा करता आल्या. लोकेश राहुल यावेळी सलग तिसऱ्या सामन्यात अपयशी ठरल्याचे पाहायला मिळाले. कारण राहुलला या सामन्यात ९ धावांवर समाधान मानावे लागले. भारताचे दोन्ही सलामीवीर बाद झाले असले तरी विराट कोहली हा खेळपट्टीवर होता. कोहली या विश्वचषकात भन्नाट फॉर्मात आहे, त्यामुळे तो मोठी खेळी साकारेल, असे वाटत होते. पण कोहली यावेळी १२ धावांवर बाद झाला.

गुजरातमध्ये मोठी दुर्घटना; केबल ब्रिज कोसळला

सुराज्य/मोरबी

गुजरातच्या मोरबीमध्ये मोठी दुर्घटना घडली आहे. मच्छू नदीवर बांधण्यात आलेला केबल ब्रिज अचानक कोसळला. त्यामुळे अनेक जण नदीत पडले.

त्यांना बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. नदीत नेमके किती जण पडले त्याची नेमकी माहिती अद्याप समोर आलेली नाही. दुर्घटना घडली त्यावेळी पुलावर मोठ्या संख्येनं लोक उपस्थित होते असं प्रत्यक्षदर्शींनी सांगितलं. पोलीस आणि प्रशासनाकडून बचाव कार्य सुरू आहे. स्थानिकदेखील यामध्ये सहकार्य करत आहेत. विशेष म्हणजे ५ दिवसांपूर्वीच पूल नूतनीकरणानंतर सुरू करण्यात आला होता. नूतनीकरणानंतरही अशा प्रकारची घटना घडल्यानं अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. दुर्घटनेनंतर केबल ब्रिजचे अनेक फोटो समोर आले आहेत. पूल मधून तुटून नदीत कोसळल्याचं फोटोतून दिसत आहे. पूल कोसळल्यानं अनेक जण मध्येच अडकले. तुटलेल्या पुलाला पकडून त्यांनी कसाबसा आपला जीव वाचवला.

टेम्पोच्या धडकेने वृध्द ठार

सुराज्य/मोहोळ : रस्ता ओलांडण्यासाठी उभ्या असलेल्या मोटरसायकलला पाठीमागून आयशर टेम्पो ने धडक देऊन झालेल्या अपघातात एक जण ठार झाल्याची घटना ३० ऑक्टोबर रोजी दुपारी २. ३० चे दरम्यान' हिवरे पाटी चौकात घडली.

या बाबत पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार हिवरे येथील शामराव औदुंबर बारबोले वय ५२ हे मोटार सायकल क्रमांक एम एच १३ ए एल २४५८ या मोटारसायकल वरून घराकडे जाण्यासाठी हिवरे पाटी चौकात उभे राहिले असता पाठीमागून भरधाव वेगाने येणारा टेम्पो क्रमांक पी बी, १० जी झेड ६५९३ ने जोरदार धडक दिल्याने शामराव औदुंबर बारबोले हे गंभीर जखमी झाले. त्यांना मोहोळ येथील रुग्णालयात उपचारासाठी नेत असता त्यांचा मृत्यू झाला. याबाबत टेम्पो चालकावरती गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास अपघात पथकाचे पो हेड कॉन्स्टेबल पवार करीत आहेत

मंत्रालयात वरिष्ठ अधिकाऱ्याचा असाही प्रताप;

उपसंचालक महिला अधिकाऱ्याचा विनयभंग

सुराज्य/मुंबई

मंत्रालयात एक धक्कादायक घटना घडली. मंत्रालयाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्याने संबंधित विभागात काम करणाऱ्या उपसंचालक दर्जाच्या महिला अधिकाऱ्याचा विनयभंग केला. आरोपी अधिकाऱ्याने मला कंटाळा आलाय माझ्यासाठी गाणे म्हणून दाखव, अशी मागणी पीडित महिला अधिकाऱ्याकडे केली आहे.

हा सर्व प्रकार आरोपी अधिकाऱ्याच्या कॅबिनमध्ये घडला असून यावेळी विभागाचे उपसचिवही कॅबिनमध्ये उपस्थित होते. दरम्यान या अधिकाऱ्याला निलंबित करण्यात आल्याचे कळते.

मला कंटाळा आलाय, माझ्यासाठी गाणे म्हण...

या प्रकारानंतर पीडित महिला अधिकाऱ्याने संबंधित विभागाच्या मंत्र्यांकडे लेखी तक्रार दाखल केली. विधिमंडळाच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी एका व्हिडिओत दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला उपसंचालक दर्जाच्या पदावर काम करतात. १८ ऑक्टोबर रोजी संबंधित विभागातील अवर सचिव स्तरावरील पुरुष अधिकाऱ्याने पीडित महिला अधिकाऱ्याचा विनयभंग केला. मला बरे वाटत नाही, मला कंटाळा आला आहे. माझ्यासाठी गाणे म्हणून दाखव, ' अशा प्रकारची मागणी आरोपीने केली आहे. या घटनाक्रमानंतर भारतीय जनता पार्टीच्या महिला नेत्या चित्रा वाघ यांनी संबंधित घटनेचा निषेध केला आहे. त्यांनी पीडित महिला अधिकाऱ्याशी फोनवरून चर्चा केली. यानंतर त्यांनी संबंधित आरोपी अधिकाऱ्याची तत्काळ चौकशी करून त्याला निलंबित करण्याचा आदेश द्यावा, अशी मागणी विभागाच्या मंत्र्यांकडे केली आहे. येत्या एक-दोन दिवसांत चौकशी पूर्ण होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. आरोपांमध्ये तथ्य आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यावर तत्काळ कारवाई केली जाईल. हे शिंदे-फडणवीसांचे सरकार आहे. मुलींचा आणि महिलांचा विनयभंग करणाऱ्या आणि त्यांच्याकडे वाकड्या नजरेनं पाहणाऱ्यांची गय केली जाणार नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया चित्रा वाघ यांनी दिली.

सासुरवाडीत पत्नी आणि मेहुणीने बदडले

सुराज्य/सोलापूर : पगारीचे पैसे न सांगता येऊन का गेली. असे विचारण्यासाठी सासुरवाडीत गेलेल्या जावयाला पत्नी आणि मेहुणीने लाथा बुक्क्याने बदडले. ही घटना सदर बाजार परिसरातील हैजनपूर येथे शनिवारी सायंकाळच्या सुमारास घडली.

सायण्णा शंकर आडकूल (वय ४५ रा. सातरस्ता, म्युन्सिपल कॉलनी) असे जखमीचे नाव आहे. तो काल सायंकाळी सासुरवाडीत जाऊन पत्नीला पगारीचे पैसे न सांगता का येऊन गेली? असे विचारण्यासाठी गेला होता. त्यावेळी त्याला पत्नी आणि मेहुणीने मिळून लाथाबुक्क्याने मारहाण केली. त्यानंतर तो स्वतः उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल झाला. या घटनेची नोंद सदर बजार पोलिसात झाली आहे.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

देवा! त्या निष्पाप जीवाची काय चूक ?

दिल्लीचे 'पाणी' नाही चांगले, गड्या आपला महाराष्ट्रच परवडला

गडकरींनी पुन्हा 'टोला' लगावला

सुराज्य/मुंबई

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारमधील परखड बोलणारे तसेच कार्यक्षम मंत्री म्हणून लौकिक कमावलेले भाजप नेते तथा केंद्रीय परिवहन व रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी शनिवारी पुन्हा सडेतोड विधान करून आपल्या हातातील भाला फेकला. त्यांच्या एका विधानाने राजकीय पंडितांच्या भुवया उंचावल्या आहेत. गडकरी यांनी कुणाच्या दिशेने ही भालाफेक केली, मोदी-शहा यांच्या दिशेने तरी नाही ना? अशी चर्चा आता रंगली आहे. दिल्लीतील राजकारणासंदर्भात आपल्या मनात साठलेल्या भावनांना त्यांनी वाट मोकळी करून दिली. ''मी राजकारणात गेल्यानंतर दिल्लीला गेलो. आजपर्यंत अनेक लोकांना भेटलो. खूप मोठी वाटणारी माणसे खुजी निघाली. छोटी वाटणारी माणसे उत्तुंग होती. असे अनेक अनुभव घेतले. पण दिल्लीचे 'पाणी' चांगले नाही. आपला महाराष्ट्रच चांगला आहे'', असे गडकरी यांनी म्हणाले.

मुंबईच्या आयआयटीमध्ये शनिवारी झालेल्या एका कार्यक्रमात ते बोलत होते. त्यामुळे गडकरी यांचा 'खुजी लोक' या वक्तव्याचा रोख नेमका रोख कुणाकडे? याविषयी तर्क-वितर्क काढले जात आहेत. काही दिवसांपूर्वी गडकरी यांची भाजपच्या संसदीय समितीमधून गच्छंती झाली होती. तेव्हापासून त्यांना भाजप पक्षसंघटनेत बाजूला सारण्याची प्रक्रिया सुरु झाल्याची चर्चा आहे. या पार्श्वभूमीवर त्यांची अलीकडच्या काळातील त्यांची अनेक वक्तव्ये ही एकप्रकारचा गर्भित इशारा असल्याचा राजकीय जाणकारांचा अंदाज आहे. त्यामुळे दिल्लीतील राजकारणाविषयीचे त्यांची विधाने चर्चेची ठरू लागली आहेत. गडकरी यांनी आगामी लोकसभा निवडणूक भरघोस मतांनी जिंकणार असल्याचा दावाही केला. मी माझ्या मतदारसंघात साडेतीन लाख मतांनी जिंकलो, पुढच्या वेळेस पाच लाखांपेक्षा जास्त मतांनी जिंकेन, असा विश्वास व्यक्त केला. प्रशासकीय काम करताना अहंकारामुळे अनेकदा मॅनेजमेंट लेव्हलला अडचणी निर्माण होतात. संबंध कसे असावे हा सगळीकडेच महत्त्वाचा विषय आहे, आपण आयात काय करतो ते बघा. त्याला पर्याय शोधा, त्यावर रिसर्च करा त्याचा खूप फायदा होईल, असेही गडकरी म्हणाले. मला भारतातून पेट्रोल-डिझेलला हद्दपार करायचे आहे. हा एक अवघड संकल्प असल्याचेही ते म्हणाले.

ट्विटरचे नवे वादळ

साऱ्या विश्वात सोशल मीडियातील ट्विटरचे एक नवे वादळ उठले आहे. जगात बलाढ्य श्रीमंत असणारे 'टेस्ला','स्पेसएक्स' या कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी एलॉन मस्क यांनी नुकताच 'ट्विटर'वर ताबा मिळवला. या कंपनीचे मालकी हक्क मिळताच त्यांनी काही धोरणांमध्ये बदलांचे संकेत दिल्याने जगात एक नव्याने वादळ उठले आहे. वैविध्यपूर्ण दृष्टिकोनासह ट्विटर 'कंटेंट मोडरेशन कौन्सिल' तयार करणार असल्याचे त्यांनी म्हटले होते. याबाबत त्यांनी पुन्हा ट्वीट करत भूमिका स्पष्ट केली. ट्विटरच्या 'कंटेंट मोडरेशन' धोरणामध्ये अद्याप बदल केले नसल्याचे स्पष्टीकरण त्यांनी दिल्यानंतर नेमके त्यांचे धोरण काय आहे? याविषयी जगात संभ्रम निर्माण झाला आहे.ट्विटरवरील मजकूराशी निगडित सर्व निर्णय आणि बंद झालेले खाते पुन्हा सुरू करण्यासंदर्भात कौन्सिल निर्णय घेईल, असे ते म्हणाले होते. दरम्यान, ट्विटरवरील मजकूरासंदर्भात त्यांनी आणखी एक ट्वीट केले आहे. ट्विटरवर विनोद कायदेशीर असेल, असा निर्वाळा त्यांनी दिला आहे. कंपनीने या निर्णयाबाबतच्या नियम आणि अटी अद्याप स्पष्ट केलेल्या नाहीत. ट्विटर खरेदी करताच मस्क यांनी यावरील मजकूरासंदर्भात प्रतिक्रिया दिली होती. या प्लॅटफॉर्मवर विविध विचारसरणीचे लोक हिंसा टाळून वादविवाद करू शकतील. सध्या समाजमाध्यमे अतिउजवे आणि अतिडावे यात विभागली जाण्याची भीती आहे. त्यामुळे तिरस्कार आणि समाजातील दरी वाढत जाईल, असे मस्क यांनी म्हटले होते. त्यानंतर ट्विटरमध्ये 'कंटेंट मोडरेशन' संदर्भात हालचालींना वेग आला आहे. ट्विटरची मालकी मिळताच त्यांनी सीईओ पराग अग्रवाल यांच्यासह व्यवस्थापनातील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांना बाहेरचा रस्ता दाखवला. यामध्ये कायदा विभागाचे प्रमुख विजया गड्डे, मुख्य वित्तीय अधिकारी नेड सेगल यांचाही समावेश आहे. ट्विटरच्या सात हजार कर्मचाऱ्यांना बेरोजगारीचा सामना करावा लागण्याची भीती व्यक्त केली गेलीय. ज्या ट्विटरबद्दल गेले कित्येक दिवस चर्चा सुरू होती, ते सर्वात महत्त्वाचे असे सोशल मीडिया माध्यम आता मस्क यांच्या हाती आल्याने ते वेसण वाटेल त्याप्रमाणे आवळत आहेत. अमेरिकेतून त्यांच्यावर यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होतोय. सूत्रे आल्या आल्या कित्येक कर्मचाऱ्यांना बडतर्फ करणे म्हणजे ट्विटरच्या पॉलिसी बदलली जाणार याविषयी जोरदार चर्चा सुरू आहे. मात्र, त्यांनी युझर्स यांना आश्वासन दिले आहे की अजूनही ट्विटरच्या पॉलिसीज बदलल्या नाहीत. एकूणच सध्या ट्विटरची सूत्रे मस्ककडे असल्याने काही लोकांना अतीव दुख झाले आहे तर काहींनी त्यांना पाठिंबा दाखवला आहे. जसे फेसबुक हा आपला डेटा विकते तसे ट्विटरही करणार का अशी चर्चा व्हायला सुरुवात झाली आहे. ४४ बिलियन डॉलर्सला ट्विटर विकत घेणारे मस्क हे वापरकर्त्यांचा डेटा वापरणार की नाही याविषयी सारे जग साशंक आहे. सध्या जे-ते ट्विटरवरील डेटा हा कायमचा डिलिट करू शकतील. त्यासाठी ते ट्विटरकडे विनंती करू शकतील पण, या प्रक्रियेसाठी ३० दिवस लागतील. काही लोकांमध्ये अशाही चर्चा सुरू आहेत की, ट्विटरवर जर तुम्ही कुणाला डायरेक्ट मेसेज (डीएम) केले असतील तर ते ट्विटरच्या सर्वरवर वर्षानुवर्षे तसेच राहतील. हे मेसेज एखादी योग्य व्यक्ती नक्कीच वाचू शकते. हार्वर्ड बिझनेस स्कूलचे प्रोफेसर अँडी वू यांनी यावर स्पष्टीकरण दिले आहे. त्यांच्या मते, ही गोष्ट होण्याची शक्यता फार कमी आहे. ट्विटरची टीम मस्क यांच्या डेटासाठी येणाऱ्या विनंत्या पूर्ण करण्यास नकार देऊ शकते. त्यासाठी त्यांना संचालक मंडळाकडून परवानगी घ्यावी लागेल. शिवाय एलॉन हे लवकरच स्वतःचे स्वतंत्र संचालक मंडळ स्थापन करणार आहेत. त्यामुळे ही शक्यता नाकारता येणार नाही, पण वाटेल त्या ट्विटर युझरच्या डेटावर ते थेट नियंत्रण ठेवू शकणार नाहीत. लोकांच्या खासगी डेटाबरोबर नेमके एलॉन काय करणार आहेत यामागील हेतू तूर्तास तरी स्पष्ट झालेला नाही. नुकत्याच केलेल्या एका ट्वीटमध्ये एलॉन यांनी स्पष्ट केले आहे की, ट्विटर युझर्सच्या गरजेनुसार शक्य तितक्या संबंधित असलेल्या जाहिरातींसह ट्विटरला जगातील सर्वात प्रतिष्ठित जाहिरात प्लॅटफॉर्म बनवायचे आहे. त्यामुळे तुमचा डेटा नक्कीच विकला जाऊ शकतो आणि जर मस्क यांना तसे करायचे असेल तर ते हे नक्कीच करू शकतील, असे जाणकार सांगतात. ट्विटरचे वापरकर्ते जगात खूप आहेत. राजकीय क्षेत्रात त्याचा अधिकाधिक उपयोग केला जातोय. आपले मत मांडल्यानंतर ते क्षणात लोकांपर्यंत पोहचते. हा एक मोठा फायदा ट्विटरचा होतो आहे. तेव्हा ही लोकप्रियता एलॉन यांच्या पचनी पडते की नाही हे पहावे लागेल. केंद्र सरकार एलॉन यांच्याविषयी काय भूमिका येते हेही इथे महत्त्वाचे ठरेल.

आठवणीतल्या इंदिराजी

पंडित जवाहरलाल नेहरू यांची कन्या श्रीमती इंदिरा गांधी यांचा जन्म १९ नोव्हेंबर १९१७ रोजी एका प्रतिष्ठित कुटुंबात झाला होता. त्यांना जगभरातील सर्वोच्च विद्यापीठांमधून डॉक्टरेटच्या उपाधीने गौरविण्यात आले होते. प्रभावी शैक्षणिक पार्श्वभूमी असल्याने त्यांना कोलंबिया विश्वविद्यालयाकडून विशेष योग्यता प्रमाणपत्र देण्यात आले होते. श्रीमती इंदिरा गांधी सुरुवातीपासूनच स्वातंत्र्यसंग्रामात सक्रिय होत्या. बालपणी त्यांनी 'बाल चरखा संघ' स्थापन केला आणि असहकार चळवळी दरम्यान काँग्रेस पक्षाच्या मदतीकरिता १९३० मध्ये लहान मुलांच्या साथीने 'वानर सेना' देखील उभी केली होती. सप्टेंबर १९४२ साली त्यांना तुरुंगात टाकण्यात आले होते. १९४७ साली श्रीमती इंदिरा गांधी यांनी महात्मा गांधींच्या मार्गदर्शनाखाली दिल्लीतील दंगलग्रस्त भागात काम केले.

पुण्यतिथीनिमित्त...

- - - - - - - - - - -

२६ मार्च १९४२ रोजी श्रीमती इंदिरा गांधींनी फिरोज गांधी यांच्याशी विवाह केला. त्यांना दोन मुले होती. १९५५ मध्ये श्रीमती इंदिरा गांधी काँग्रेस कार्यकारी समिती व केंद्रीय निवडणूक समितीच्या सदस्य झाल्या. १९५८ मध्ये त्यांना काँग्रेसच्या केंद्रीय संसदीय मंडळाच्या सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले. त्या 'एआयसीसी'च्या राष्ट्रीय एकता परिषदेच्या अध्यक्ष व १९५६ मध्ये अखिल भारतीय युवा काँग्रेस तसेच 'एआयसीसी' महिला विभागाच्या अध्यक्ष बनल्या. १९५९ ते १९६० या वर्षात त्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेस च्या अध्यक्ष होत्या. जानेवारी १९७८ मध्ये त्यांनी पुन्हा हे पद स्वीकारले.

१९६४ ते १९६६ दरम्यान त्या माहिती व प्रसारण मंत्री होत्या. त्यानंतर जानेवारी १९६६ ते मार्च १९७७ पर्यंत त्या पंतप्रधान होत्या. त्याबरोबरच त्यांना सप्टेंबर १९६७ पासून मार्च १९७७ पर्यंत अणू ऊर्जा मंत्री होत्या. त्यांनी ५ सप्टेंबर १९६७ ते १४ फेब्रुवारी १९६९ पर्यंत परराष्ट्र मंत्रालयाचा अतिरिक्त भार सांभाळला. १४ जानेवारी १९८० मध्ये त्या पुन्हा पंतप्रधान झाल्या. ऑगस्ट १९६४ ते फेब्रुवारी १९६७ पर्यंत श्रीमती इंदिरा गांधी राज्यसभेच्या सदस्य होत्या. चौथ्या, पाचव्या आणि सहाव्या सत्रात त्या लोकसभा सदस्य होत्या. जानेवारी १९८० मध्ये त्या रायबरेली (उत्तरप्रदेश) व मेडक (आंध्रप्रदेश) येथून सातव्या लोकसभेवर निवडून गेल्या. रायबरेलीची जागा सोडून त्यांनी मेडकच्या जागेची निवड केली. त्यांना १९६७-७७ मध्ये आणि पुन्हा जानेवारी १९८० मध्ये काँग्रेस संसदीय मंडळ नेता म्हणून निवडले गेले. विविध विषयात रुची ठेवणाऱ्या श्रीमती इंदिरा गांधी आयुष्याला एका निरंतर प्रक्रियेच्या रूपात पाहत असत. ज्यामध्ये काम आणि आवड हे त्याचे वेगवेगळे पैलू आहेत ज्यांना कोणत्याही प्रकारे विभिन्न करता येत नाही किंवा त्यांचे वेगवेगळ्या श्रेणीत वर्गीकरण करता येणार नाही.

त्यांनी आपल्या जीवनात अनेक क्षेत्रात लौकिक प्राप्त केला. त्यांना १९७२मध्ये भारतरत्न पुरस्कार, १९७२ मध्ये बांगलादेश मुक्तीकरिता मेक्सिकन अकादमी पुरस्कार, १९७३ मध्ये एफएओ चे दुसरे वार्षिक पदक व १९७६ मध्ये नागरी प्रचारिणी सभेकडून साहित्य वाचस्पती (हिंदी) पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते. १९५३ साली श्रीमती इंदिरा गांधी यांना अमेरिकेच्या 'मदर' पुरस्काराने, मुसद्देगिरीतील उत्कृष्ट कार्याबद्दल इटलीने 'इसाबेला डी'इस्टे' पुरस्कार व येल विद्यापीठाने हॉलंड मेमोरियल पुरस्कार देऊन गौरविले. फ्रांस जनमत संस्थेच्या सर्वेक्षणानुसार त्या १९६७ व १९६८ मध्ये फ्रान्सच्या जनतेमधल्या सर्वात लोकप्रिय महिला होत्या. १९७१ मध्ये अमेरिकेच्या विशेष गैलप जनमत सर्वेक्षणानुसार त्या जगातील सर्वात लोकप्रिय महिला होत्या. प्राण्यांच्या संरक्षणासाठी १९७१ मध्ये अर्जेंटिना सोसायटीकडून त्यांना मानद उपाधी देण्यात आली होती.

१९७७ साली त्यांनी देशात आणीबाणी लागू करण्याचा वादग्रस्त निर्णय घेतला. यामुळे १९८० पर्यंत त्या सत्तेपासून दूर राहिल्या. १९८० च्या निवडणुकांत जनतेने पुन्हा त्यांच्यावर विश्वास दाखवला. पण यावेळी त्यांना अशांत पंजाबचा सामना करावा लागला.

ऑपरेशन ब्ल्यू स्टारचा निर्णय खलिस्तान चळवळीला आळा घालण्यासाठी घेतला. पण अखेर त्यामुळेच त्यांच्या २ सुरक्षारक्षकांकडून त्यांची हत्या झाली.

पोलादी पुरूष

भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जन्मदिनी राष्ट्रीय एकता दिवस साजरा केला जातो. भारतीय राष्ट्रीय चळवळीला वैचारिक आणि कार्यात्मक मार्गाने नवी दिशा दिल्याने सरदार पटेल यांना राजकीय इतिहासात अतिशय अभिमानास्पद स्थान मिळाले आहे, स्वातंत्र्यानंतर संस्थानांचे एकत्रीकरण करून अखंड भारताच्या निर्मितीमध्ये त्यांचे योगदान कधीही विसरता येणार नाही.

- - - - - - - - - - - - - - -

सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी गुजरातमधील नडियाद येथे झाला. खेडा जिल्ह्यातील करमसद येथे राहणारे झवेर भाई आणि लाडबा पटेल यांचे ते चौथे अपत्य होते. १८९७ मध्ये वयाच्या २२ व्या वर्षी त्यांनी मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण केली. वल्लभभाईंचा विवाह झाबेरबा यांच्याशी झाला होता. पटेल केवळ ३३ वर्षांचे असताना त्यांच्या पत्नीचे निधन झाले.सरदार पटेल अन्याय सहन करू शकत नव्हते. शालेय जीवनापासूनच त्यांनी अन्यायाला विरोध करण्यास सुरुवात केली. नडियाद येथील त्यांच्या शाळेतील शिक्षक पुस्तकांचा व्यापार करून विद्यार्थ्यांना बाहेरून पुस्तके न आणता त्यांच्याकडून खरेदी करण्यास भाग पाडायचे. वल्लभभाईंनी याला विरोध करत विद्यार्थ्यांना शिक्षकांकडून पुस्तके विकत घेऊ नका, असे आवाहन केले. त्यामुळे शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये बाचाबाची झाली. पाच ते सहा दिवस शाळा बंद राहिल्या. शेवटी सरदार जिंकले. शिक्षकांच्या वतीने पुस्तके विकण्याची प्रथा बंद झाली. सरदार पटेल यांना त्यांचे शालेय शिक्षण पूर्ण करण्यासाठी बराच वेळ लागला.



जयंतीनिमित्त...

वयाच्या २२ व्या वर्षी त्यांनी १०वीची परीक्षा दिली. सरदार पटेल यांचे वकील बनण्याचे स्वप्न होते आणि त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांना इंग्लंडला जावे लागले, परंतु भारतीय महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी त्यांच्याकडे पुरेसे आर्थिक साधन नव्हते. त्या काळात उमेदवार स्वतंत्रपणे अभ्यास करून कायद्याच्या परीक्षेला बसू शकत होता. अशा परिस्थितीत सरदार पटेल यांनी त्यांच्या ओळखीच्या वकिलाकडून पुस्तके घेतली आणि घरीच अभ्यास सुरू केला. बारडोली सत्याग्रहाचे नेतृत्व करणाऱ्या पटेल यांना सत्याग्रहाच्या यशाबद्दल तेथील महिलांनी 'सरदार' ही पदवी बहाल केली. स्वातंत्र्यानंतर विविध संस्थानांमध्ये विखुरलेल्या भारताच्या भौगोलिक-राजकीय एकात्मतेत मध्यवर्ती भूमिका बजावल्याबद्दल पटेल यांना 'भारताचा बिस्मार्क' आणि 'लोहपुरुष' म्हणूनही संबोधले जाते. पटेल हे जातिवाद आणि वर्गभेदाचे कट्टर विरोधक होते.

इंग्लंडमध्ये कायद्याचे शिक्षण घेतल्यानंतरही त्यांचा कल पैसा कमावण्याकडे नव्हता. सरदार पटेल १९१३ मध्ये भारतात परतले आणि त्यांनी अहमदाबादमध्ये सराव सुरू केला. लवकरच ते लोकप्रिय झाले. आपल्या मित्रांच्या सांगण्यावरून पटेल यांनी १९१७ मध्ये अहमदाबादच्या स्वच्छता आयुक्तपदाची निवडणूक लढवली आणि त्यात ते विजयीही झाले.

गांधींच्या चंपारण सत्याग्रहाच्या यशाने सरदार पटेल खूप प्रभावित झाले होते. १९१८ मध्ये गुजरातमधील खेडा विभागात दुष्काळ पडला होता. शेतकऱ्यांनी करमुक्तीची मागणी केली, परंतु ब्रिटिश सरकारने ती नाकारली. गांधीजींनी शेतकऱ्यांचा प्रश्न मांडला, पण त्यांना त्यांचा पूर्ण वेळ खेड्यात घालवता आला नाही, म्हणून ते त्यांच्या अनुपस्थितीत या संघर्षाचे नेतृत्व करू शकतील अशा व्यक्तीच्या शोधात होते. यावेळी सरदार पटेल यांनी स्वेच्छेने पुढे येऊन संघर्षाचे नेतृत्व केले.

गृहमंत्री म्हणून त्यांचे पहिले प्राधान्य रियासत (राज्यांचे) भारतात एकत्रीकरण करणे हे होते. रक्त न सांडता त्यांनी हे काम केले. हैद्राबादच्या 'ऑपरेशन पोलो'साठीच त्यांना सैन्य पाठवायचे होते. भारताच्या एकीकरणात त्यांच्या महान योगदानासाठी त्यांना भारताचे 'लोहपुरुष' म्हणून ओळखले जाते. ५६२ लहान-मोठ्या संस्थानांचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण करून भारतीय एकता निर्माण करणे हे सरदार पटेल यांचे सर्वात मोठे योगदान होते.

जगाच्या इतिहासात एवढ्या मोठ्या संख्येने राज्ये एकत्र करण्याचे धाडस करणारा एकही माणूस नाही. ५ जुलै १९४७ रोजी एक रियासत विभाग स्थापन करण्यात आला. सरदार पटेल यांचे स्वतः चे घरही नव्हते. ते अहमदाबादमध्ये भाड्याच्या घरात राहत होते. १५ डिसेंबर १९५० रोजी मुंबईत त्यांचे निधन झाले तेव्हा त्यांच्या बँक खात्यात केवळ २६० रुपये होते.

टुडेज् ब्लॉग

समान रोजगार कायदा आणा

अमुक लाख लोकांना रोजगार देणारा प्रकल्प तमुक राज्यात वळता केला अथवा त्या राज्याने पळवला. त्यासाठी राजकीय कुरघोड्या कारणीभूत ठरल्या असे नानाप्रकारचे आरोप होतात आणि प्रत्यारोपही होतात. यात ज्यांना रोजगार पाहिजे त्यांच्या हाती काहीच लागत नाही. 'तेलही गेले, तूपही गेले हाती राहिले धुपाटणे' अशी बेरोजगारांची अवस्था होते. एकमेकांवर आरोपांच्या शाब्दिक फैरी झाडणारे काही कालावधीने शांत होतात. पण, बेरोजगारीचा प्रश्न कायम राहतो. वाचाळपणा करण्यासाठी नेत्यांना कौशल्य विकासाचे धडे गिरवावे लागत नाहीत. तो राजकारणाचा अविभाज्य भाग असल्याने तो आपसूकच अंगी मुरला जातो. कौशल्य विकास, व्यक्तिमत्त्व विकास वगैरे काय ते ज्यांना नोकरीची आवश्यकता आहे त्यांच्यासाठी. ज्यांना तंत्रज्ञानाचे ज्ञानही नाही किंबहुना दूर पर्यंत त्याच्याशी संबंध नाही. अशी मंडळी व्यावसायिक प्रकल्पविषयक संबंधित कंपन्यांशी चर्चा करतात यापेक्षा दुर्दैव ते काय? रोजगार, उद्योगखात्याचे मंत्री महोदय हे उच्चशिक्षितच पाहिजेत. पण, तसे नसल्याने सावळा गोंधळ आहे. त्यामुळे 'आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय' असा प्रकार चालू आहे.

दुसरे सूत्र असे की, 'समान नागरी कायदा' आणा अशी बहुतांश जनतेची मागणी आहे. तो राष्ट्रीय स्तरावर कधी अस्तित्वात येईल? याविषयी अनिश्चितता आहे. पण या कायद्याकडून लोकांना पुष्कळ अपेक्षा आहेत. हे मात्र नक्की. याच पार्श्वभूमीवर 'समान रोजगार कायदा' आणण्यासाठी केंद्र सरकारने अभ्यास चालू करावा. कारण प्रकल्प पळवला वगैरे ऐकून, वाचून वैताग आला आहे. एखाद्या कंपनीचा प्रकल्प आसाम राज्यात होवो अथवा केरळ राज्यात अथवा हिमाचल प्रदेशात त्यांना भूसंपादन, वीज, पाणी, आवश्यक कर यांचे दर पूर्ण देशात समान असावेत.

एखादा प्रकल्प कर्नाटक राज्यातील बेंगळुरू शहरात होत आहे, म्हणून त्याचे मूल्य अधिक आणि तोच प्रकल्प ओडिशा राज्यातील भुवनेश्वर या राजधानीत होत आहे म्हणून त्याची किंमत अल्प असे कदापी नसावे. तसेच नोकऱ्यांत 'भूमीपुत्रांना प्राधान्य' हे सूत्र वगळून 'गुणवत्तेलाच प्राधान्य' या सूत्राचा समावेश करावा. त्यामुळे ज्या प्रांतवादाच्या भिंती उभ्या केल्या आहेत त्यांना नेस्तनाबूत करता येईल आणि एक देश म्हणून पूर्ण क्षमतेने काम करता येईल.

परिणामी प्रांतवादाच्या नावाने राजकीय पोळ्या शेकणाऱ्या धूर्त लोकांच्या उठाठेवींना चाप बसेल. राजकीय दुकानदारी बंद होऊन आपले महत्त्व कमी होऊ नये यासाठी लोकांना आपसात झुंजवत ठेवणाऱ्या लबाडांना त्यांचे डावपेच यशस्वी होऊ न देण्यासाठी समान रोजगार कायद्यासारख्या खमक्या कायद्यांची नितांत आवश्यकता आहे. लक्षावधी भारतीय अमेरिका, युरोपमध्ये नोकरी करत आहेत.

भारताच्या कुशल मनुष्यबळाचा स्वतःचा देश घडवण्यासाठी ते देश उपयोग करत आहेत. तेव्हा असा विचार होत नाही की भारतीय नको त्याऐवजी अमुक देशातीलच लोक हवेत. हाच विचार भारताने देशातील राज्यांच्या पातळीवर केला तर महाराष्ट्रातून कोणीही देशातील कोणत्याही राज्यात नोकरीसाठी गेला तर त्याला निश्चिंतपणे नोकरी करता येईल, तसेच कायदा असल्याने विरोध होण्याचे कारणही नसेल.

प्रकल्प आपल्या राज्यात खेचण्यासाठी राज्यांत स्पर्धा होत आहे. त्यामुळे एका राज्याच्या वार्षिक उत्पन्नात वाढ होत आहे तर दुसऱ्या राज्याला नवीन प्रकल्पाची प्रतीक्षा सतावत राहते. या सर्वांना पूर्णविराम मिळावा यासाठी समान रोजगार कायदा आणाच. कारण या स्पर्धेचे स्वरूप प्रांतीय आहे. हे लपत नाही. केवळ नावाला स्पर्धा असे म्हणायचे आणि विचार करताना मात्र प्रांताप्रमाणे झुकते माप द्यायचे. यामुळे देशाचे भले होणार नाही.

- जयेश राणे, मुंबई.

जन्म हा अखेरचा

धर्माचारस्थल - १

कधीही, कोणत्याही प्रकारची हिंसा न घडणे याला 'अहिंसाव्रत' म्हटले जाते.

धर्माचारस्थल - २

काशीक्षेत्राला 'कामधेनू' असे संबोधले जाते. आपल्या सर्व इच्छा पूर्ण करणारी कामधेनू आहे, त्याप्रमाणे काशीदेखील एक कामधेनू होय. गाईला आपण चारा खाऊ घालतो तेंव्हा ती आपल्याला दूध देते. मग या काशीरुपी कामधेनूचा चारा कोणता? तर ती इथे येणाऱ्या भक्ताजवळचा पुण्य-पापरुपी चारा खाऊन त्यांना मोक्षरुपी अमृतमय दूध देते. येथे पुण्यात्म्याला आणि पापात्म्याला देखील मुक्ती मिळते. याप्रमाणे कलियुगात काशीला कामधेनू मानले जाते. तपश्चर्या करणे ही मनुष्याची काशीक्षेत्रात सहजस्थिती मानली जाते. काशीत येऊन तुम्ही प्राणायाम, ध्यान, धारणा इ. करता ते ठीकच आहे. परंतु येथे जो साधक आपला सर्व भार भगवान विश्वनाथावर सोपवून निश्चिंतपणे झोपतो, त्याची निद्रादेखील येथे एक 'योग' ठरतो. काशीत बसून काही गप्पा मारल्या तर त्या गप्पा देखील येथे जप ठरतात. अन्य क्षेत्रांत जप केल्याने जेवढा पुण्यलाभ होतो तेवढाच काशीला बसून केलेल्या सामान्य गप्पांमुळे होतो.

(क्रमशः) – काशी जगद्गुरु
डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.

जनमानस

...ही तर खरी भारताची शान!

भारतीय वंशाचे ऋषी सुनक यांना ब्रिटनचे पंतप्रधान म्हणून बहुमान मिळाला आहे. ऋषी सुतक हे ४२ वर्षाचे असून ते तेथील कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाचे खासदार आहेत. विशेष म्हणजे ब्रिटनचे ते सर्वात तरुण पंतप्रधान असतील. ब्रिटनच्या पंतप्रधानपदी प्रथमच एखाद्या भारतीय वंशाच्या सुपुत्राला ही संधी गेल्या २०० वर्षात प्रथमच मिळत आहे.

ऋषी सूनक यांचे आई व वडील पंजाबचे रहिवाशी होते. ते विदेशात स्थायिक झाले. सुनक यांचा जन्म ब्रिटनमध्ये झाला आहे. अमेरिकेतील स्टँडफोर्ड विद्यापीठात त्यांनी एमबीएचे शिक्षण घेतले असून ऑक्सफर्ड विद्यापीठातून त्यांनी अर्थशात्र व राजकारणाचे धडे घेतले आहेत. २०१५ साली खासदार झालेले सुनक यांनी २०१७ तसेच २०१९ मध्ये तिसऱ्यांदा खासदार पदाचा मान मिळविला. थेरेसा सरकारमध्ये व जॉन्सन सरकारमध्ये ते मंत्री होते. सध्या ते ब्रिटनमधील रिचमंड येथील खासदार आहेत. सुनक यांनी कोरोना काळात ब्रिटनमध्ये उत्तम कामगिरी बजाविली होती. २०२० मध्ये त्यांनी हॉटेल इंडस्ट्रीजसाठी इट आऊट टू हेल्प आऊट ही योजना आणली. त्यामुळे १५ हजार कोटींची बचत झाली. इन्फोसिस कंपनीचे संस्थापक आर. नारायण मूर्ती यांचे सुनक हे जावई आहेत. सुनक हे सध्या ६५६६ कोटी रुपयांचे मालमत्ताधारक आहेत. भारत ब्रिटिशांच्या पारतंत्र्यात १५० वर्षांहून अधिक काळ होता. त्या ब्रिटनच्या साम्राज्यावर सूर्य कधी मावळत नव्हता. त्याच ब्रिटनच्या पंतप्रधानपदी एका भारतीय वंशाच्या सुपुत्राची निवड व्हावी हा नियतीने घेतलेला एका प्रकारचा बदलाच म्हणता येईल. पंतप्रधान मोदींनी सुनक यांचे निवडीबद्दल अभिनंदन केले असून अनेक जागतिक मुद्द्यावर आपण एकत्र काम करू, असे सूतोवाच केले आहे.

- शांताराम वाघ, पुणे.

वैचारिक गुलामगिरी

मोहोळ ऋषी सुनक यांची इंग्लंडच्या पंतप्रधानपदी निवड झाल्याबद्दल विशेष अभिनंदन. एक सर्वार्थाने हिंदू आचार आणि विचारांचा असणारा, इंग्लंडसारख्या देशाच्या सर्वोच्च पदावर पोहोचतो, याचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे. मिळालेले हे पद कोणाच्या वशिल्याने, जातीपातीच्या आधारे किंवा नव्याने महाराष्ट्रात रुजलेल्या खोके संस्कृतीचे प्रतीक नाही. हे कर्तृत्वाचे पद आहे.

या निमित्ताने भारत देशात जी सार्वत्रिक चर्चा चालू आहे ती मात्र विचाराची गुलामगिरी दर्शविणारी आहे. विशेषतः राजकीय पक्ष आणि त्यांच्या संबंधित लोकांची गुलामगिरी अधिक प्रकर्षाने जाणवत आहे. विषय कोणताही असो, आरोप प्रत्यारोप ही दैनंदिन बाब झालेली आहे. त्या क्षेत्रातली माहिती असो, अक्कल असो अथवा नसो. याही पेक्षा वाईट गोष्ट अशी की विचार व्यक्त करत असताना आपण नेमके कोणत्या दिशेने जात आहोत याचा विसर या लोकांना पडतो आहे. यांचे विचार भरकटलेले आहेत. त्याला संस्कार, संस्कृती आणि सामाजिक भान याचा पाया नाही हे प्रकर्षाने जाणवत आहे. आपला देश हजारो वर्षाच्या परंपरेने चालत आलेल्या संस्कार संस्कृती आणि सभ्यता याबाबतीत परिपूर्ण होता व बहुतांशी तो आहे हे समजून घ्यावयास कोणीच तयार नाही.

ऋषी सुनक इंग्लंडचे पंतप्रधान होत असताना भारतीय लोक राज्य करण्यास कसे सक्षम आहेत, हे सांगण्याचा प्रयत्न होत आहे. त्यानिमित्ताने दाखले दिले जात आहेत ते विस्टन चर्चिल यांनी भारताला स्वातंत्र्य का देऊ नये या निमित्ताने केलेल्या विश्लेषणाचे. भारतीय लोक राज्य चालवायच्या लायकीचे नाहीत, असे काहीसे विस्टन चर्चिल याने सांगितले होते. त्याबाबतचे काही दाखले देत विस्टन चर्चिल यांनी इंग्लंडच्या संसदेत भारतास स्वातंत्र्य देण्याबाबत आपली नकारात्मक भूमिका मांडलेली होती. तो त्यांचा अभ्यास होता. त्यांचे विचार होते. आणि त्यांना दिलेली जी जबाबदारी होती ती त्यांनी पार पडली होती.

विस्टन चर्चिलच्या अहवालाचा संबंध हा इंग्रज राजवटीच्या अखेरच्या पर्वातला एक भाग आहे. ईस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातून भारत देशावरती सत्ता काबीज करून राज्य स्थापन करावयाचे का नाही याबाबत इंग्लंडच्या संसदेत चर्चा झाली होती. त्यासाठी जॉन मॅकेलो या अधिकाऱ्याला अहवाल सादर करावयाची जबाबदारी दिली होती. भारतात देशभर फिरून तेथील परिस्थितीची माहिती घ्यावी आणि ती संसदेपुढे मांडावी ही त्यांच्यावरची जबाबदारी होती. यात जॉन मेकल यांनी जे नमूद केले होते, त्याचा मात्र आमच्या राजकीय पक्षांना त्यांच्या नेत्यांना आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना तथा पाठिराख्यांना विसर पडलेला आहे. कारण भारत देशातील नेमक्यांच्या वस्तुस्थितीची मांडणी त्याने केलेली होती. भारत देशात कोणीही गरीब नाही, कोणी भिकारी नाही, येथील समाज एका समृद्ध संस्कृतीने बांधला गेलेला आहे आणि म्हणूनच येथे राज्य करायचे असेल तर यातील शिक्षण पद्धती आपण बदलली पाहिजे. असा त्याच्या अहवालाचा सारांश होता. तत्कालीन भारतीय संस्कृतीच्या या पैलुचा, आजच्या राजकीय पक्षांना आणि त्यांच्या तथाकथित भ्रमिष्ट होत चाललेल्या पाठीराख्यांना प्रेम नाही. अशा समृद्ध सुसंस्कृत जनतेवर राज्य करण्याची यांची मानसिकता नाही. हेच आता स्पष्ट होत आहे की काय अशी शंका येऊ लागलेली आहे. ज्या समृद्ध संस्कृतीने ऋषी सुनक, यांच्यावर संस्कार झालेले आहेत, जे त्यांनी मनोमन सहकुटुंब जपलेल्या आहेत आणि त्यांनी आपल्या आयुष्यात त्याचा विसर पडू दिलेला नाही, तीच संस्कृती आणि तेच संस्कार आज इंग्लंडच्या सर्वोच्च पदावरती विराजमान होत आहेत. याचा आमच्या लोकांना विसर पडलेला आहे. हा सोयीस्करपणे पडलेला विसरला नाही, तर एकमेकांवरील आरोप प्रत्यारोपात विचारांची जी गुलामी आलेली आहे, त्याचे हे प्रतीक आहे.

सर्वच राजकीय पक्ष जर आपल्या देशाच्या संस्काराची संस्कृतीची आणि सभ्यतेचे विचारात येणार नसतील तर ते या देशावर कधीच समर्थपणे राज्य करू शकणार नाहीत.राजकारण्यांना देश चालवण्यापेक्षा राजकारण करीत समाजामध्ये नेहमी फूट पडलेली असावी अशीच इच्छा दिसते आहे. तोडा फोडा आणि राज्य करा या इंग्रजांच्या तत्त्वाचा काँग्रेस भाजप सहित सगळ्यांच राजकीय पक्षांनी अंगीकार केलेला दिसतो आहे. हे देशाचे दुर्दैव आहे. नाही म्हणायला नरेंद्र मोदींच्या कार्यपद्धतीवरून आपल्या देशाला काही चांगले दिवस येतील अशी स्वप्ने सर्वसामान्य जनता बघत आहे. त्याला त्यांच्याच भारतीय जनता पक्षाचे वागणुकीतून पाठबळ मिळत नाही. याचे उत्तर कोणालाच नको आहे.

आजचे राजकीय पक्ष आणि त्यांची धोरणे पाहता, हे सारे भरकटलेल्या राजकीय विचाराने राज्यशकट चालवत आहेत असेच म्हणावे लागेल. ऋषी सुनक, विस्टन चर्चिल आणि जॉन मेकॅलो हे या भरकटलेल्या राजकीय विचारांच्या प्रदर्शनाचे निमित्त झाले असावेत.

- श्रीनिवास वैद्य, सोलापूर.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळये.

मुंडेवाडी येथे पैशांच्या व्यवहारातून दोन गटात चाकू लोखंडी गजाने मारहाण

सुराज्य/सोलापूर

भावकीतील दोन गटात पैशाच्या व्यवहारातून चाकू, लोखंडी गज, काठी आणि लाथा बुक्क्याने केलेल्या मारहाणीत चौघे जखमी झाले. ही घटना मुंडेवाडी (ता. अक्कलकोट) येथील गावात आज रविवारी दुपारच्या सुमारास घडली. त्यांना अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

मायप्पा संगप्पा कोळी (वय ४०) त्याचा भाऊ आनंद (वय ३८) आणि सोमनाथ हनुमंत जमादार (वय ३८ सर्व रा. मुंडेवाडी) अशी पहिल्या गटातील जखमींची नावे आहेत. त्यांना शिवानंद धोंडप्पा कोळी, सचिन कोळी, प्रदीप कोळी आणि त्याची पत्नी अशा चौघांनी चाकू लोखंडी गज आणि लाथाबुक्क्याने मारहाण केली.

तर दुसऱ्या गटातील शिवानंद धोंडप्पा कोळी (वय ५५) हा जखमी झाला. त्याला मायप्पा कोळी,

अनिल कोळी आणि सिद्दप्पा कोळी यांनी लोखंडी रॉडने मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली आहे.

शिवणे येथे मारहाण; महिलेसह चौघां विरुध्द गुन्हा

सांगोला-भावकीतील पूर्वीच्या भांडणावरून काठी, प्लास्टिकचे पाईप आणि चप्पलने केलेल्या मारहाणीत भाऊसाहेब हरिबा हजारे (वय ४५ रा. शिवणे ता. सांगोला) हे जखमी झाले. ही घटना शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास जखमीच्या घराजवळ घडली.

या प्रकरणात सांगोल्याच्या पोलिसांनी नितीन रावसाहेब हजारे, त्याचे दोन भाऊ सचिन आणि सतीश, तसेच जया सचिन हजारे (सर्व रा. शिवणे) या चौघाविरुध्द गुन्हा दाखल केला. सहाय्यक फौजदार पवार पुढील तपास करीत आहेत.

बार्शी येथे मारहाण करून रोकड, दागिने लुटले; ५ जणांवर गुन्हा

बार्शी-शेतीचा व्यवहार रद्द कर असे सांगून देखील केले नाही. या कारणावरून दुचाकीवरून पाठलाग करीत लाकडी दांडग्याने मारून खिशातील १० हजार रुपये रोख, सोन्याची चैन आणि मोबाईल असा ऐवज लुटून नेल्याची घटना अहिल्याबाई होळकर बागेजवळ शनिवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात बार्शी शहरच्या पोलिसांनी संजय आरगडे आणि अन्य चौघ अशा पाच जणाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

यासंदर्भात सतीश मालनभाई अंधारे (वय ३५ रा. शिवाजीनगर बार्शी) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. काल सकाळी १० वाजेच्या सुमारास ते दुचाकीवरून निघाले होते. त्यावेळी पाठलाग करीत दुचाकीवरून आलेल्या संजय आरगडे आणि त्याच्या चार साथीदारांनी दुचाकी अडवून त्यांना मारहाण केली. तुला शेतीच्या व्यवहार रद्द कर असे सांगून देखील का केला नाही? असे म्हणत त्यांच्या खिशातील रोकड आणि दागिने लुटून पोबारा केला. अशी नोंद पोलिसात झाली. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक इज्जापवार करीत आहेत.

आ. रणजितसिंह यांच्या हस्ते शिधा वाटप

सुराज्य/अकलूज : राज्य सरकारने घोषणा केल्याप्रमाणे १०० रुपयात शिधा वाटपाच्या वितरणाला अकलूज येथे सुरुवात झाली असून या आनंदाचा शिधा किटमध्ये एक किलो साखर, एक किलो रवा, एक किलो चणाडाळ, एक लिटर पामतेल या चार वस्तूचा समावेश आहे. शिधा संचाचे अंत्योदय व प्रधान्य कुटुंब योजनेतील पात्र शिधापत्रिकाधारकांना प्रतिनिधीक स्वरूपात वाटप शुभारंभ आ रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. राज्यातील ७ कोटी शिधापत्रिकाधारकांना सदर निर्णयाचा लाभ मिळणार असून त्यांची दिवाळी सणाचा आनंद वृध्दिंगत झाला आहे. दिवाळीच्या या विशेष भेटीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांचे यावेळी धन्यवाद मानले गेले. माळशिरस रेशन दुकानदार संघटनेचे अध्यक्ष वैभव जवाहरलाल फडे यांचे दुकानात अकलूज ग्राहक भांडार येथे आनंदाचा शिधा हे किट वाटप आ. मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सचिन फडे, उपसभापती प्रतापराव पाटील उपस्थित होते. याप्रसंगी अकलूज ग्राहक भांडारच्या वतीने आ. मोहिते-पाटील यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

रिपाइं महिला आघाडी मोहोळ तालुका अध्यक्षपदी मधू फाळके

सुराज्य/सोलापूर : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया व रिपब्लिकन अल्पसंख्याक विभाग सोलापूरच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्तेयांची बैठक पक्षाच्या संपर्क कार्यालयात घेण्यात आली या बैठकीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया मोहोळ तालुका महीला आघाडी च्या अधक्ष पदी मौजे चिंचोली येथील मधू फाळके यांची निवड करण्यात आली या वेळी बैठकीच्या आधक्ष पदी पक्षाचे प्रदेश आधक्ष सुबोध वाघमोडे हे होते या बैठकीस रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाव रिपब्लिकन अल्पसंख्याक विभाग चे माणिक आठवले जककापा कांबळे रावसाहेब परीकक्षाळे राजाभाऊ लोंढे गौस पिरजादे इजाज शेख रफिक शेख सलीम मुल्ला महबूब पठाण मारुती सोनवले सोहेल जहागीरदार धर्मा माने मुकुंद काबंळे इम्रान शेख इबराहिम शेख समीर मुजावर आपपसाहेब लगोटे इरफान कलयाणी आरूणा सरवदे नसरीन शेख प्रतीक फाळके इ पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

श्री कुमारस्वामीजी जीवन व कार्य ग्रंथाची कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांना भेट

'तपोवन'साठी ५ कोटींच्या मागणीला तत्वतः मान्यता

सुराज्य/सोलापूर

राजेंद्र मायनाळ लिखित 'श्री कुमारस्वामीजी जीवन व कार्य' या ग्रंथाची भेट कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मईयांना देण्यात आली. श्री कुमारस्वामीजींच्या तपोवन धारवाड येथील नियोजित विकास कामांसाठी देण्यात आलेल्या ५ कोटींच्या प्रस्तावाला मुख्यमंत्री बोम्मई यांनी तत्वतः मान्यता दिली.

सोलापूर शहर जिल्ह्यासह महाराष्ट्र आणि कर्नाटकच्या सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये श्री कुमारस्वामीजींचा अनुयायी वर्ग प्रचंड मोठ्या प्रमाणात आहे. श्री कुमार स्वामीजींच्या कार्याची माहिती सर्व दूर जावी यासाठी राजेंद्र मायनाळ यांनी लिहिलेल्या 'श्री कुमारस्वामीजी जीवन व कार्य' या ग्रंथाचे प्रकाशन विजयपूर येथील ज्ञानयोग आश्रमाचे श्री सिध्देश्वर महास्वामीजी यांच्या हस्ते नुकतेच झाले. कर्नाटकचे

मुख्यमंत्री बसवराज बोम्मई धारवाड दौऱ्यावर असताना योग विहारातर्फे त्यांना ग्रंथ भेट देण्यात आला. तब्बल ५ हजार ग्रंथांच्या स्वागतमूल्यातून जमा झालेला कर्तव्यनिधी योगविहाराच्या विकासासाठी वापरण्यात येणार असल्याचे राजेंद्र मायनाळ यांनी मुख्यमंत्री श्री. बोम्मई यांना सांगितले. यावेळी तपोवन धारवाड येथे नव्याने बांधण्यात येणाऱ्या भक्तनिवास, अन्नछत्र आदी विकासकामांसाठी ५ कोटींच्या निधीस तत्वतः मान्यता देण्यात आली.

यावेळी तपोवन धारवाडचे सचिव काशिनाथ हादीमनी, कोषाध्यक्ष बी. डी. पाटील, विश्वस्त शिवशंकर लातूरे, , विश्वस्त राजेंद्र मायनाळ, विश्वस्त जी. बी. वागदरे, फॉरवर्ड ब्लॉकचे शिवदास लखादिवे आदी उपस्थित होते.

एस.पी. प्रतिष्ठानतर्फे सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन

सोलापूर :- भीम युवक क्रीडा मंडळ संचलित एस पी प्रतिष्ठानच्या वतीने सालाबाद प्रमाणे सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. हा विवाह सोहळा २५ डिसेंबर रोजी गोरज मुहूर्तावर सारनाथ बुध्दविहार मैदान भवानी पेठ मड्डी वस्ती सोलापूर येथे होणार असल्याची माहिती संस्थापक समीर पांडगळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यंदा विवाह सोहळ्याचे पाचवे वर्ष आहे. सामुदायिक विवाह सोहळा पंचवीस डिसेंबर रोजी होणार असून वधू वरास मणी मंगळसूत्र, जोडवे, बेड, राजा राणी कपाट, विवाहाचे कपडे, संसारपयोगी साहित्य, भांड्याचा रॅक व खास वधु वरांसाठी लकी ड्रॉ काढून टू व्हीलर गाडी भेट देण्यात येणार आहे तसेच वऱ्हाडी मंडळींची भोजनाची व्यवस्था करण्यात येणार आहे असे समीर पांडगळे यांनी सांगितले या विवाह सोहळ्यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या नातेवाईकांनी एस पी प्रतिष्ठान कार्यालयात नावनोंदणीसाठी समीर पांडगळे ९६६५५७१७११, प्रशांत बनगे ९९२२१५६४२० यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

निधन वृत्त

कमल वाकळे

सुराज्य/मोहोळ : मोहोळ येथील रहिवासी कमल रामचंद्र वाकळे (वय ८९) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्या सिध्देश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र वाकळे यांच्या मातोश्री होत.

मंगल आंधळकर

सुराज्य/माळशिरस : माळशिरस तालुक्यातील पिलिव येथील रहिवाशी मंगल सुरेश आंधळकर (वय ६७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, विवाहित मुलगी असा परिवार आहे.

दुरुस्तीसाठी दिलेली रिक्षा चोरट्याने पळविली

सुराज्य/सोलापूर :

दुरुस्तीसाठी दिलेली रिक्षा क्रमांक एम. एच. १३. सीटी. १९९४ हि अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.

ही घटना दि. २५ ऑक्टोबर रोजी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास चिराग अली तकिया कब्रस्तान जोडभावी पेठ सोलापूर येथे घडली. याप्रकरणी कजीम मौलाली शेख (वय-३५, रा. सहारा नगर सोसायटी होटगी रोड) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

राज्यस्तरीय थांग-ता मार्शल आर्ट स्पर्धेकरिता सोलापूरचा संघ रवाना

सुराज्य/सोलापूर

आखिल महाराष्ट्र लष्कर शास्त्राधी विविध शिक्षण प्रसार मंडळ व ऑल महाराष्ट्र थांग - ता असोसिएशन यांच्या मान्यतेने सोलापूर जिल्हा थांग - ता मार्शल आर्ट क्लब असोसिएशनच्या वतीने जिल्हा निवड चाचणी ठेवण्यात आली होती. तरी या जिल्हास्तरीय स्पर्धेत एकुण ३६ विद्यार्थीच्या निवड झालेली आहे.

निवड झालेले विद्यार्थी वयोगट १४ वर्षो खालील मुले- रुद्रांश रापेल्ली, मोहिज चौधरी, प्रतिक संकण्णा, रुद्र मोटे, सार्थक गायकवाड, अमियान शेख, सुफियान शेख, विराट कुडक्याल, सिध्दाराम सावळगी, जयंत कामुर्ती, रेहान चौधरी, प्रितम संकण्णा, हिमेश कुमावत, विघ्नेश बुरा, अथर्व बिद्री, वरुण गुंडला, सिध्दाराम मुकणे, आरिज मुल्ला, मोहित लिंबोळे, निशांत शेळके, वयोगट १४ वर्षो खालील मुली- रुची जाधव, सृष्टी गिरे, अस्मिता गुंडला, दर्शना नरल, सोमवती भोसले, श्रावणी अलदी, भक्ती साळुंके, अदविका कोटा, नेहा पोटाबत्ती, १८ वर्षा खालील मुले- सुरज कामुर्ती, अचुतानंद कवडदेवी, तेजस देशमुख, १८ वर्षा खालील मुली- समिता दुडम, साक्षी तरटे, १८ वर्षा वरील मुली- अश्विनी देवकर, १८ वर्षा वरील मुले- मनिष लिंबोळे, वसिम शेख. या स्पर्धा दिनांक ३०, ३१ ऑक्टोंबर व दिनांक ०१ नोव्हेंबर रोजा कोल्हापूर येथे सब जुनिअर, जुनिअर व सिनीअर गटात स्टाईल -१, स्टाईल -२ व वैयक्तिक कौशल्य या क्रिडा प्रकारात स्पर्धा होत आहेत. या राज्यस्तरीय स्पर्धेतून राष्ट्रीय स्पर्धकरीता खेळाडु निवडला जाणार आहे.

थांग - ता हा खेळ मान्यता प्राप्त असून, या खेळास महाराष्ट्र ऑल्मपिक असोसिएशन, भारतीय ऑल्मपिक असोसिएशन, भारतीय खेळ प्राधिकरण, स्कुल गेम्स फेडरेशन ऑफ इंडिया व खेलो इंडिया या क्रिडा स्पर्धेमधे समाविष्ट आहे. या सर्व खेळाडुंना सोलापूर जिल्हा थांग - ता मार्शल आर्ट क्लब, असोसिएशन चे अध्यक्ष व मुख्य शिक्षक आप्पासाहेब महादेव चिंचकर यांचे मार्गदर्शन मिळालेले आहे.

उपळाई (ठोंगे) संघाने पटकाविला ओमप्रकाश ठाकरे चषक

सुराज्य/सोलापूर : बार्शी तालुक्यातील कोरफळे येथे श्री येमाई देवी क्रिकेट क्लबच्यावतीने ओमप्रकाश ठाकरे 'चषक' ही टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा पार पडली. यामध्ये जे. आर. सीसी उपळाई ठोंगे संघाने राज्यकर्ते बारलोणी संघावर मात करीत विजेतेपद पटकाविले.

स्पर्धेचे यंदाचे चौथे वर्ष होते. एकूण २४ संघांनी सहभाग नोंदविला होता. अंतिम सामना जे. आर. सीसी उपळाई ठोंगे विरूध्द राज्यकर्ते बारलोणी यांच्यात झाला. प्रथम फलंदाजी करताना जे. आर. सीसी संघाने निर्धारित ५ षटकात ४ बाद ६६ धावा केल्या. प्रत्युत्तरात मैदानात उतरलेला राज्यकर्ते संघ ५ षटकात ४ बाद ५९ धावांवर आटोपला. जे. आर. सीसी उपळाई ठोंगे संघाने हा सामना ७ धावांनी जिंकत ५१ हजार रुपये व चषक असे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले.

उपविजेत्या राज्यकर्ते बारलोणी संघास ३१ हजार रुपये व चषक प्रदान करण्यात आला. तृतीय क्रमांकाचे २१ हजार रुपये व चषक हे बक्षीस छत्रपती सीसी चारे संघाने तर, चौथ्या क्रमांकाचे ११ हजार रुपये व चषक हे बक्षीस मोडनिंब संघाने पटकाविले. मालिकावीरचा किताब प्रदीप जगदाळे (छत्रपती सीसी चारे) याने पटकाविला. वैभव वैद्य हा सामनावीर ठरला. उत्तरेश्वर तांबारे (राज्यकर्ते बारलोणी) हा उत्कृष्ट फलंदाज तर, संदीप बागल (राजभोसरे सीसी) हा उत्कृष्ट गोलंदाज ठरला.

प्रथम पारितोषिक जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष कौरव माने यांनी, द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक सोमनाथ ठाकरे यांनी, तृतीय क्रमांकाचे पारितोषिक अंगद गवळी यांनी तर, चौथ्या क्रमांकाचे पारितोषिक फारुक आतार यांनी दिले होते. स्पर्धेसाठी महेश नलवडे, अभी ठाकरे, लहू गवळी, अक्षय वांगदरे, रणजित माने, सूरज चौधरी, सुज्ञेश तिकटे, सूरज नलवडे, संकेत तिकटे यांच्यासह येमाई देवी क्रिकेट क्लबचे खेळाडू व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

सरपंच सुरवसे यांच्या हस्ते ७३ लाभार्थीना धनादेश

सुराज्य/अक्कलकोट

गोगाव तालुका अक्कलकोट येथे ग्रामपंचायत अंतर्गत सन २०२२- २०२३ या वर्षातील स्वनिधी उत्पन्नातून करावयाच्या खर्चातून मागासवर्गीय मधील एकूण ३३ कुटुंबाच्या लाभार्थ्यांना, महिला व बालकल्याण या योजनेतून ३१ महिलांना आणि ९ अपंग लाभार्थ्यांना, अशा एकूण ७३ लाभार्थ्यांना २३४००० रकमेचे वाटप गोगावच्या सरपंच वनिता मधुकर सुरवसे यांच्या हस्ते करण्यात आले. सरपंचांनी सर्व लाभार्थ्यांना बोलवून दिवाळी फराळ खाऊ घालून, सर्व लाभार्थ्यांना धनादेश देऊन त्यांची दिवाळी गोड केली, यावेळी उपसरपंच कमलाकर, ग्रामसेवक विक्रम घाटे, ग्रामपंचायत सदस्य प्रदीप जगताप, लक्ष्मण बिराजदार, ललिता कलशेट्टी, महादेवी मुलगे, आदिच्या उपस्थितीमध्ये गरजू लाभार्थ्यांना चेक वाटप करण्यात आले.

यावेळी बोलताना सरपंच वनिता सुरवसे म्हणाल्या की आम्ही सरपंच उपसरपंच व सर्व सदस्य पदभार स्वीकारून दीड वर्षे झाले आणि ह्या दीड वर्षात ग्रामपंचायतचा महसूल प्रचंड प्रमाणात वाढवला आहे, या महसूल वाढीमुळे आम्ही तुम्हाला हा निधी देऊ शकलो, पुढच्या वर्षी ह्या महसुलात अजून दीडपट वाढ करण्याचा मानस आहे तरी सर्व गावकऱ्यांनी पाणीपट्टी, घरपट्टी भरून सहकार्य करावे. सर्वांनी शंभर टक्के घरपट्टी, पाणीपट्टी भरल्यास अजून गरजू लोकांना मदत करता येईल. ग्रामपंचायतच्या स्वनिधी मधून आज सर्व समाजातील लोकांना न्याय देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, आज पहिल्या टप्पात गरजू लोकांचे आम्ही मासिक सभेत लाभार्थी निवड करून आज त्याना चेक वाटप केले आहे. एकाच वेळी सर्व गरजू लोकांना निधी देणे शक्य नाही, तरी येत्या काळात राहिलेल्या गरजू लोकांना सुध्दा ग्रामपंचायत नक्की मदत करेल. यापुढे ही आम्ही गावाच्या विकासासोबत सामान्य जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी सदैव प्रयत्नशील आहोत.

यावेळी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांनी सर्व लाभार्थ्यांचे अभिनंदन केले आणि ग्रामपंचायत कर भरण्यासाठी सर्व गावकऱ्यांना आवाहन केले व रस्त्यावरील राडाराडा हटवण्यासंबंधीत ग्राम विकास अधिकारी यांना तात्काळ नोटीस बजवण्यास सांगितले, नोटीस देऊन सुध्दा जे रस्त्यावर घाण करतील, त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यास सांगितले. यावेळी पंचक्रोशी मध्ये सर्वात जास्त लाभार्थ्यांना लाभ देण्यामध्ये गोगाव ग्रामपंचायत अव्वल स्थानी राहिली. सर्व ठिकाणाहून गोगावचे सरपंच व उपसरपंच यांचे कौतुक होत आहे. या यावेळी तंटामुक्त अध्यक्ष सूर्यकांत जिरगे, शरणप्पा कलशेट्टी, अनिल मुलगे, कल्लप्पा बनसोडे, सुरेश सोनकांबळे, परमेश्वर गायकवाड, नितीन गायकवाड, आदी उपस्थित होते.

अखेर पार्क स्टेडियम समोरील पार्किंगची जागा झाली कचरामुक्त

सुराज्य/सोलापूर

दिवाळी संपली... फटाके स्टॉल उठले... मात्र त्या ठिकाणी असलेला मोठ्या प्रमाणातील कचरा जैसे थे होता. महापालिका कचरा व्यवस्थापन विभागाला उशिरा का होईना जाग आली. अखेर पार्क स्टेडियम समोरील पार्किंग जागा परिसरात निर्माण झालेले फटाकाच्या कचऱ्याचे साम्राज्य दुर झाले. रविवारी सायंकाळी महापालिकेने हा परिसर कचरा मुक्त केला.

फटाके स्टॉल धारकांचा बेजबाबदारपणा

फटाके स्टॉल धारकांनीही दररोजचा कचरा व्यवस्थापन केलं नाही. घंटागाडीत न देता बेजबाबदारपणे स्टॉलखाली कचरा टाकला होता. स्टॉल काढताच खाली हा कचरा सर्वत्र पसरला असल्याचे दिसून आले. महापालिका प्रशासनाने तातडीने कचरा उचलला नसल्याने या जागेला कचरा कुंडीचे स्वरूप आले होते. कचरा व्यवस्थापन विभागाला उशिरा का होईना जाग आली. अखेर रविवारी सायंकाळी पाच वाजता महापालिकेची घंटागाडी दाखल झाली. कर्मचाऱ्यांनी येथील कचरा उचलला. आणि हा परिसर कचरा मुक्त झाला.

दिवाळीनिमित्ताने पार्क स्टेडियम समोर असलेल्या पार्किंगच्या जागेवर फटाके स्टॉल्स उभारण्यात आले होते. दरम्यान, आता दिवाळी संपली. फटाके स्टॉलही काढण्यात आले. परंतु या ठिकाणी फटाक्याचे वेस्टन व इतर प्लास्टिकचा कचरा मोठ्याप्रमाणात पडून होता. यामुळे या परिसरात कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाले होते. महापालिकेने केलेल्या दुर्लक्षामुळे मध्यवर्ती ठिकाणी कचरा पसरला होता. चार हुतात्मा पुतळा चौकाच्या बाजूलाच असलेल्या या परिसरात निर्माण झालेले कचऱ्याचे साम्राज्य संतापजनक होते.

Change In Name

I hereby declare that my old name **Qazi Khalid Ismail** has been changed to New Name **Qazi Sayed Mohammed Khalid Sayed Ismail** and residing at House No. 370/9 A Muslim Pachha Peth, Solapur - 413005.

Blank
Blank
Blank

किल्ले बांधणी स्पर्धेत बंदिछोडे तर रांगोळी स्पर्धेत स्वामी, कोळी प्रथम

सुराज्य/सोलापूर : निंबर्गी (ता. द. सोलापूर) येथील राष्ट्रप्रथम युवा संघाने दीपावली सणानिमित्त घेतलेल्या किल्ले बांधणी स्पर्धेत रोहन बंदिछोडे याने तर रांगोळी स्पर्धेत अबोली स्वामी, गायत्री कोळी यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

किल्ले बांधणी स्पर्धेतील विजेत्यांना रोख बक्षीस तर सर्व सहभागींना छत्रपती शिवरायांची मूर्ती भेट देण्यात आली. रांगोळी स्पर्धेतील विजेत्यांनाही रोख बक्षीस आणि सर्व सहभागी स्पर्धकांना गुलाबाचे रोप, स्वामी विवेकानंदांचे पुस्तक देण्यात आले. तसेच दोन्ही स्पर्धेतील सहभागी स्पर्धकांना बांधकाम व्यावसायिक केदार बिराजदार यांच्याकडून रंगखडूचे बॉक्स भेट देण्यात आले.

मंद्रुप पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मांजरे, फौजदार ढवले, सलबती, पोलीस पाटील राजकुमार बिराजदार, पशुवैद्यक डॉ. पाटील, निवृत्त पोलीस पाटील शंकरगौडा पाटील, भारत बिराजदार, सिध्दाराम हत्ताळे, डॉ. शुभम बिराजदार, गंगाधर गुरव यांच्या हस्ते विजेत्यांसह सहभागी स्पर्धकांना गौरविले. याप्रसंगी राष्ट्रप्रथम युवा संघाच्या कार्यकर्त्यांसह ग्रामस्थ उपस्थित होते. **स्पर्धानिहाय विजेते** - किल्ले बांधणी : प्रथम: रोहन आनंद बंदिछोडे, द्वितीय : सुमित धर्मराया बोरगी, तृतीय : श्रेयस नामदेव मोरे. रांगोळी : मोठा गट : प्रथम: अबोली बम्मय्या स्वामी, द्वितीय : जनाबाई महादेव डोंगरे, तृतीय : प्रियांका सिध्दाराम सुतार. लहान गट : प्रथम : गायत्री चंद्रकांत कोळी, द्वितीय : समृध्दी इरेशा कोळी, तृतीय : वैष्णवी तानाजी गायकवाड.

पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयास विभागीय क्रीडा स्पर्धेचे यजमानपद

सुराज्य/सोलापूर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे अंतर्गत ए. जी. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, सैफुल सोलापूर यांना सोलापूर विभागीय क्रीडा स्पर्धेचे यजमानपद मिळाले, सोलापूर विभाग अंतर्गत सोलापूर,हिंगोली, परभणी, नांदेड, उस्मानाबाद व लातूर असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाशी संलग्न असलेले अशा ६ जिल्ह्यातील ४० महाविद्यालय विभागीय स्पर्धेसाठी सहभागी होणार आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अंतर्गत प्रथमच विभागीय स्पर्धेचे आयोजन होत आहे. हा बहुमान व विभागीय स्पर्धेचे जबाबदारी ए. जी. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयास दिल्याबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू, क्रीडा विभागातील पदाधिकारी यांचे संस्था संचालक शिवानंद एस. पाटील यांनी आभार मानले. यापूर्वी सोलापूर विद्यापीठ अंतर्गत अनेक स्पर्धेचे यशस्वीरित्या आयोजन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

महाविद्यालयाचे अनेक खेळाडू पश्चिम विभागीय व अखिल भारतीय विद्यापीठस्तरावरील विविध क्रीडा प्रकारात आपले योगदान दिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाने दिलेली विभागीय क्रीडा स्पर्धेचे जबाबदारी यशस्वीपणे नियोजन करू, असे महाविद्यालयाचे प्राचार्य तथा स्पर्धा समिती अध्यक्ष डॉ. एस. ए. पाटील यांनी कळवले. विभागीय अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक यांची प्रथम बैठक दि .३१ ऑक्टोबर २०२२ रोजी सकाळी ११ वा. ए. जी. पाटील महाविद्यालयात आयोजित करण्यात येणार आहे. यावेळी स्पर्धा नियोजन, तारीख व ठिकाण ठरवण्यात येईल, असे विभागीय स्पर्धा सचिव शारीरिक शिक्षण संचालक प्रा. शिवशरण कोरे यांनी कळविले आहे. विभागीय स्पर्धेचे आयोजन संस्था सचिव सिध्देश्वर पाटील, कॅम्पस डायरेक्ट डॉ. एम. ए. चौगुले, उपप्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार व सर्व विभाग प्रमुख यांच्या मार्गदर्शनानुसार करण्यात येणार आहे.

वेळापूर येथे आनंदाचा शिधाचे मान्यवरांच्या हस्ते वाटप

सुराज्य/वेळापूर : महाराष्ट्र शासन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून दिवाळी निमित्त वाटप करण्यात येणारा आनंदाचा शिधा १०० रुपयात तेल, साखर, डाळ आणि रवा या वस्तूंचे किटचे वाटप अकलूज डी. वाय. एस. पी. डॉ. बसवराज शिवपुजे, माळशिरस तालुक्याचे तहसीलदार जगदीश निंबाळकर तसेच वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव, जि. प. माजी सदस्य सतीशराव माने-देशमुख, माळशिरस तालुका भा. ज. पार्टी उपाध्यक्ष व वेळापूर विकास सोसायटीचे चेअरमन व भाजपा माळशिरस तालुका उपाध्यक्ष अमरसिंह माने देशमुख, व्हा. चेअरमन व सावता परिषद प्रदेश उपाध्यक्ष महादेव ताटे, ॲड. रणजित माने-देशमुख, ग्रामपंचायत माजी सदस्य दिपक राऊत, भैय्या कोडग, उमेश भाकरे, सोसायटी सचिव भागवत मिले, शॉप मॅनेजर सुरज साखरे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी कार्डधारक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गळ्यातील सोन्याचे गंठण हिसकावले

सुराज्य/सोलापूर : दुचाकीवर आलेल्या अनोळखी दोघा तरुणांपैकी मागे बसलेल्या तरुणाने एका महिलेच्या गळ्यातील ६० हजार रुपये किमतीचे सोन्याचे गंठण हिसकावून चोरून नेल्याची घटना दि. २९ ऑक्टोबर रोजी दुपारी साडेचार वाजण्याच्या दरम्यान कुमठेकर हॉस्पिटल समोर घडली.

याप्रकरणी कविता प्रकाश सातलगाव (वय-३५, रा. दत्तनगर, जुळे सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून दोन अनोळखी तरुणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी कविता व त्यांची मुलगी तसेच त्यांची मोठी जाऊ आणि सून असे तिघेजण मिळून कुमठेकर हॉस्पिटल समोरून घरी पायी चालत जात होते. त्यावेळी २२ ते २५ वयोगटातील दोन अनोळखी तरुणांनी दुचाकीवर वेगात येऊन मोटारसायकलवरील पाठीमागे बसलेल्या एका तरुणाने फिर्यादी यांच्या गळ्यातील साठ हजार रुपये किमतीचे अडीच तोळ्याचे गंठण हिसका मारून जबरदस्तीने चोरून नेले आहे, असे फिर्यादीत नमूद आहे. घटनेचा पुढील तपास पोसई मुरकुटे हे करीत आहेत.

ऊसदर आंदोलनात -

अदृश्य विघ्नसंतोषी राजकीय शक्तीचा वावर?

सुराज्य/अकलूज

सोलापूर जिल्ह्यात सध्या ऐन थंडीत ऊसदर आंदोलनाने वातावरणात गरम झालेले पाहायला मिळत असून आंदोलकांचा उद्देश साफ असला तरी काही अदृश्य विघ्नसंतोषी राजकीय शक्ती मात्र या आंदोलनाच्या माध्यमातून राजकीय उट्टे काढताना दिसत आहेत आणि यातूनच सर्वाधिक दर देणाऱ्या पांडुरंग कारखान्यासाठी ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरचे टायर फोडण्यात आले तसेच माळशिरस तालुक्यातील तांदुळवाडी साळमुख परिसरात देखील ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरचे टायर फोडण्यात आले.

ऊस दर आंदोलनाच्या माध्यमातून जे टायर फुटू लागले आहेत त्याला राजकीय दुर्गंधीची किनार असल्याची चर्चा जिल्ह्यात रंगताना दिसत असून ऊसदर संघर्ष समितीचे हे आंदोलन अनोख्या वळणावर जात असताना दिसत असून एकमेकांचे राजकीय उट्टे तर यातून काढले जात नाही ना? असा सवाल आता विचारला जात आहे.

प्रत्येक भारतीय नागरिकाला आंदोलने, मोर्चे काढण्याचा संविधानिक अधिकार आहे. आपला हक्क मागून मिळत नसेल तर आंदोलनाचे हत्यार उपसले जाते अशी असंख्य आंदोलने भारतीय इतिहासात झाली आजही ती होत आहेत आजपर्यंत झालेल्या अनेक आंदोलनातून धडा घेत आपण पुढे चालतो आहोत पण सध्याचे ऊसदर आंदोलन भलतीकडेच वाटचाल करताना दिसत आहे.

जिल्ह्यात सर्वाधिक दर देणाऱ्या पांडुरंग कारखान्याच्या ट्रॅक्टरचेच जर टायर फोडले जात असतील तर हे कशाचे द्योतक आहे असा प्रश्न आज अनेकांना पडलेला आहे. या जिल्ह्याने २०१०-११ साली झालेले राजू शेट्टी यांचे देखील ऊस दर आंदोलन पाहिलेले आहे त्यावेळेस देखील टायर फोडले होते पण त्यात पक्षपातीपणा नव्हता ऊस दराचे अंतिम ध्येय ठेवून ते आंदोलन पार पडले.

सरकारला त्या आंदोलनाची दखल घ्यावी लागली पण सध्याच्या आंदोलनातील फुटणारे टायर राजकीय दुर्गंधीचे फवारे निर्माण करणारे वाटत आहेत. २०१० ला जिल्ह्याची राजकीय परिस्थिती वेगळी होती आता खूपच वेगळी आहे. जिल्ह्यात टोकाचे राजकीय विचार निर्माण झाले आहेत. 'याला संपवा, त्याला संपवा' ही राजकीय वृत्ती वाढताना दिसत आहे. त्या त्या तालुक्याचा प्रत्येक कारखाना हा वैभव आहे. सोलापूर जिल्ह्याची ओळख ही कारखानदारीचा जिल्हा म्हणून राहिली आहे. यावरच आर्थिक गणिते देखील अवलंबून आहेत आणि यावरच राजकीय हेतूने कोणी घावा घालण्याचा प्रयत्न करीत असेल तर ही चुकीची पध्दत आरूढ होते आहे असे म्हणायला हरकत नाही. आंदोलने व्हायला हवीत पण त्यातून सरकारचे किंवा खाजगी मालमत्तेचे देखील नुकसान होता कामा नये अशी भूमिका सर्वांनी घेतली पाहिजे.

पूर्वीच्या काळातील अनेक हिंसक आंदोलनातून आपण शिकवण घेत पुढे चालतो आहोत. अलिकडील काळातील मराठा क्रांतीचेच आंदोलन पाहिले तर लाखोंचा जनसमुदाय पण या आंदोलनातील मूकमोर्चाने सर्वांना धडा घालून दिला आहे. आपल्या न्याय हक्काच्या मागण्या तोडफोड करूनच मिळतील हा विचार आता मागे पडलाय पण राजकीय हेतूने हा विचार कोणी रुजवायचा प्रयत्न करीत असेल तर मात्र सर्वांचीच पंचायत झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणूनच आंदोलनाची तीव्रता वाढवताना नाहक नुकसान होणार नाही याची दखल देखील आंदोलनकर्त्यांनी घेतली पाहिजे.

मंद्रुपमध्ये शेतकऱ्यांचे आंदोलन

सकारात्मक तोडगा काढण्यासाठी प्रयत्नशील : शिवानंद पाटील-कुडल

सुराज्य/सोलापूर

तालुक्यातील मंद्रुप येथील नियोजित एमआयडीसीसाठी जमीन देण्यास काही शेतकऱ्यांचा विरोध असून याला या परिसरातील शेतकऱ्यांचे महिनाभरापासून आंदोलन सुरू आहे. आंदोलनस्थळी सिध्देश्वर साखर कारखान्याचे संचालक व कुडल सोसायटीचे चेअरमन शिवानंद पाटील-कुडल यांनी भेट देऊन सकारात्मक तोडगा काढण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे पाटील यांनी सांगितले.

नियोजित औद्योगिक वसाहतीसाठी संबंधित शेतकऱ्यांच्या उतारावर नाव असून या उताऱ्यावरील औद्योगिक वसाहतीचे नाव कमी करावेत. या मागणीसाठी मंद्रुपमध्ये शेतकरी गेल्या अनेक दिवसांपासून ग्रामपंचायत कार्यालयासमोर आंदोलन करीत आहेत. या आंदोलनस्थळी भेट देऊन शिवानंद पाटील यांनी आमदार सुभाष देशमुख यांच्याशी चर्चा करून सोलापूरच्या जिल्हाधिकारी यांची बैठक येऊ. तसेच शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपला प्रयत्न राहणार आहे.

मंद्रुप येथील नियोजित औद्योगिक १६६ शेतकऱ्यांनी जमीन देण्यास विरोध केला आहे. अगोदर विरोध असणाऱ्या शेतकऱ्यांच्या उताऱ्यावरील एमआयडीसीचे नाव कमी करा. शेतीवरच आमचे संपूर्ण जीवन अवलंबून आहे. उताऱ्यावर एमआयडीसीसाठी आरक्षित क्षेत्र असल्यामुळे शेतीची खरेदी-विक्री करताना व बँकेचे कर्ज काढताना अनेक अडचणी येत आहेत.

यावेळी महादेव कुंभार, बाबू मेंडगुदले, प्रवीण कुंभार, अनिल जोडमोटे, श्रीशैल कुंभार, अमोल कुंभार, महेश कुंभार, बाळासाहेब तोडकरी, अमोगसिध्द जोडमोटे, मलकारी जोडमोटे, गजानन शेंडगे, अमोगसिध्द काळे यांच्यासह असंख्य शेतकरी उपस्थित होते.

खो-खो स्पर्धेसाठी सानिका पवारची निवड

सुराज्य/वेळापूर

सोलापूर जिल्हा ॲम्युचर खो-खो-खो असोशिएशन यांच्यावतीने शासकीय मैदान नेहरू नगर येथे जिल्हा अजिंक्यपद महिला निवड चाचणी घेण्यात आली. त्यामध्ये लोकविकास खो-खो क्लबमधील सानिका दिलीप पवार हिची हिंगोली येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तिला क्रीडा शिक्षक अजित बनकर, अमोल साठे, शहानवाज तांबोळी, सागर एखतपुरे, रियाज तांबोळी, धनजंय शिवपुजे, वैभव बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभले.तिच्या निवडी बद्दल लोकविकास शिक्षण संस्थेचे संस्थापक जालिंदर बनकर, सचिव चंद्रकांत नवले, मुख्याध्यापक अमोल पांढरे, सुनील पताळे, सचिन सांळुखे आदिंनी अभिनंदन केले.

'मातोश्री' २२०० रु.चा पहिला हप्ता दर पंधरवड्याला जमा करणार : म्हेत्रे

प्रलंबित हप्ते नोव्हेंबरमध्ये खात्यावर जमा करण्याची प्रक्रिया सुरू

सुराज्य/अक्कलकोट

रूद्देवाडी ता. अक्कलकोट येथील मातोश्री लक्ष्मी को. जन इंडस्ट्रीज लि. कारखान्याच्यावतीने यंदाच्या गळीत हंगामात २२०० रुपयेप्रमाणे पहिल्या हप्त्यापोटी दर पंधरवड्यात बिले अदा करण्यात येतील, असे चेअरमन सिद्धाराम म्हेत्रे यांनी सांगितले.

म्हेत्रे पुढे म्हणाले की, 'कारखान्याच्या निर्मितीपासून संस्थेकडून शेतकऱ्यांसाठी विधायक उपक्रम राबविले आहेत. मागील वर्षी म्हेत्रे परिवारावर एकापाठोपाठ एक दुःखद प्रसंग ओढविल्याने बिले अदा करण्यात वेळ झाला. परंतु शेतकऱ्यांच्या सहकाऱ्याप्रति विश्वासामुळे मागील वर्षी साडेपाच मेट्रिक टन उसाचे गाळप यशस्वीरीत्या पूर्ण झाले आहे.

यंदाच्या वर्षी पाऊस मुबलक झाल्याने ऊसतोडणीच्या प्रक्रियेत अडथळे आले असले तरी गाळपासाठी यंत्रणा सज्ज झाली आहे. यावर्षी आठ लाख मेट्रिक टन उसाचे गाळप करणार असल्याचे सिध्दाराम म्हेत्रे यांनी स्पष्ट केले. यावेळी कार्यकारी संचालक शिवराज म्हेत्रे, एज्युकेटेड डायरेक्टर बाळासाहेब कुटे, शेती तज्ञ मार्गदर्शक गुरूनाथ लोहार, जनरल मॅनेजर रावसाहेब गदादे, केन मॅनेजर खंडेराया व्हसुरे, डेप्युटी केन मॅनेजर सिद्राम गुरव. चीफ केमिस्ट माशट्टी आदी उपस्थित होते.

थकीत हप्त्यांची रक्कम नोव्हेंबरपर्यंत

सन २०२०-२१ मधील गाळपासाठी ऊस पुरवठा केलेल्या शेतकऱ्यांना ५० रुपये तर सन २०१८-१९ मधील शेतकऱ्यांना २०० रूपये राहिलेला हप्ता खात्यावर वर्ग करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. नोव्हेंबरपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण होईल. आजवर म्हेत्रे परिवारावर विश्वास ठेवून शेतकऱ्यांनी ऊस दिले आहे. यावर्षीदेखील मोठ्या प्रमाणावर उसाचा पुरवठा करून कारखान्याची वाटचाल सुरळीत ठेवण्यासाठी सहकार्य करावे.

- शिवराज म्हेत्रे,
तज्ञ संचालक-मातोश्री शुगर.

सरदार पटेल एक प्रेरणास्त्रोत : खा. डॉ. जयसिद्धेश्वर

दुर्मिळ छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन

सुराज्य/सोलापूर

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ज्या वीर स्त्री-पुरुषानी प्राण पणाला लावून काम केले त्यात सरदार पटेल यांचे स्थान अग्रगण्य आहे. केवल स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीच त्यांनी परिश्रम घेतले नाहीत, तर त्यांनी भारतातील अनेक संस्थाने एकत्र आणून भारतीय स्वातंत्र्याला बळकटी आणली. देशसेवा करण्याची इच्छा असणाऱ्या प्रत्येक भारतीयांसाठी सरदार पटेल यांचे जीवन म्हणजे एक प्रेरणास्त्रोत आहे, असे प्रतिपादन सोलापूर लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांनी येथे केले.

मध्य रेल्वे, सोलापूर विभाग आणि माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्यूरो, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय एकता दिवस निमित्त सरदार से लोहपुरुष जीवनप्रवासातील माहिती देणाऱ्या दुर्मीळ छायाचित्र प्रदर्शनाचे उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी हैदराबाद मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्य सैनिक दत्तात्रेय हिबारे, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, विभागीय रेल्वे व्यवस्थापक नीरज कुमार दोहरे, पोलीस आयुक्त डॉ राजेंद्र माने, क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंकुश चव्हाण, वरिष्ठ विभागीय कार्मिक अधिकारी जी. पी. भगत, विभागीय सुरक्षा आयुक्त ए. नवीन कुमार, वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक एल के राणेयेवले, विभागीय सुरक्षा अधिकारी शिवाजी कदम, विभागीय वित्त व्यवस्थापक विवेक होके, विभागीय सिग्नल व टेलिकम्युनिकेशन अभियंता राहुल गौड, सोलापूर स्टेशन व्यवस्थापक सुशील कुमार सिंह, क्षेत्रीय प्रचार सहायक अंबादास यादव आणि निवृत्त अधिकारी सतीश घोड़के आदि मान्यवर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी शंभरकर म्हणाले की, 'सरदार पटेल यांच उतुंग व्यक्तिमत्व आणि भारताला एकसंय करण्यासाठी त्यांनी केलेले नियोजनबद्ध कार्याची माहिती आज या प्रदर्शनाच्या माध्यमातून आपल्या सगळ्यांना बघायला मिळणार आहे.'

पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने म्हणाले की, सरदार वल्लभभाई पटेल नव्या भारताचे निर्माते आणि कुशल संघटक होते. प्रास्ताविक अंकुश चव्हाण यांनी केले. सूत्रसंचालन व आभार सचिन बनसोडे यांनी केले.

एकसंय भारताचे शिल्पकार लोहपुरुष सरदार पटेल यांची जयंती केंद्र शासनाच्यावतीने एकतेचा उत्सव म्हणून साजरा करण्यात येत आहे.

पोखरापूर येथे धनाजी-विठोबा यात्रा उत्साहात

सुराज्य/मोहोळ

पोखरापूर येथे माळावर विठ्ठल-बिरुदेवाच्या नावानं चांगभलच्या म्हणत अन् भंडारा उधळत 'धनाजी-विठोबा' यात्रा मोठ्या उत्साहात पार पडली.

महाराष्ट्रातील धनगर समाजाचे आराध्य दैवत असलेल्या विठ्ठल-बिरुदेवाची यात्रा दिवाळी पाडव्याच्या दिवशी गुरु-शिष्याच्या भेटीच्या सोहळ्याने हजारो भाविकांच्या साक्षीने साजरी झाली. दीपावलीच्या पाडव्या दिवशी दुपारी पोखरापूर गावातून पुजाऱ्यांच्या वाद्यातून विठ्ठलाची कन्या भागुबाईची पालखी गाजत वाजत भंडाऱ्याची मुक्तपणे उधळण करत नेण्यात येते. बिरुदेवाच्या मंदिराला प्रदक्षिणा घालून नंतर परज खेळण्याचा कार्यक्रम होतो. भाकणूक सांगितली जाते. महाप्रसादानंतर यात्रेचा समारोप होतो. या यात्रेत सर्व समाजातील लोक एकत्र येतात.

कोल्हापूर जिल्ह्यातील पट्टणकोडोली येथील विठ्ठल-बिरुदेव या बंधूंनी त्यांची सुमारे २४ वर्षाची तपश्चर्या करत असलेल्या पोखरापूर येथील खेलोबा वायमोडे (पुजारी) या भक्ताला दंडीचा माळ येथे दर्शन दिले. आणि हा गुरु-शिष्य भेटीचा दिवस म्हणजे दिवाळीतील पाडवा होय. त्यामुळे हे माळ पावन झाले अशी आख्यायिका सांगितली जाते. तेंव्हापासून दरवर्षी याठिकाणी मोठी यात्रा भरते. यात्रेत मोहोळ पोलीस ठाण्याचे पो. नि. अशोक सायकल यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

पाऊस समाधानकारक

पोखरापूर येथील दंडावरच्या झालेल्या यात्रेत पुढील वर्षी पाऊस समाधानकारक होणार असून रोगराईचे प्रमाण कमी होईल तसेच राजकारणामध्ये स्थित्यंतर राहील.

यावेळी मुख्य पुजारी राजुबुवा वायमोडे, शिवाजी वायमोडे, तुकाराम वायमोडे, राजकुमार वायमोडे, सुरेश वायमोडे, सोमादेव वायमोडे, अंबादास माने, हर्षद दळवे, बाबासाहेब दळवे, बालाजी वायमोडे, हणमंत वायमोडे, धनाजी वायमोडे, संतोष कारंडे, शंकर वायमोडे, पांडुरंग वायमोडे, सोमा वायमोडे, तात्या वायमोडे, अविनाश वायमोडे, बापू नरुटे, चेतन नरुटे, नितीन बरगे, योगेश वायमोडे, संपत वायमोडे आदींसह ग्रामस्थ, भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते व भांडण तंटा होणार नाही, अशी भाकणूक झाली.

इंग्लिश स्कूल वेळापूर येथे माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

सुराज्य/वेळापूर : २७ ऑक्टोबर २०२२ रोजी वेळापूर तालुका माळशिरस येथील इंग्लिश स्कूल वेळापूर येथे १९९९-२००० दहावी बॅचचा स्नेह मेळावा उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान इंग्लिश स्कूल वेळापूरचे माजी. मुख्याध्यापक प्राध्यापक श्री. मेलगेसर तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक होडगे सर, जे. जे. पवार उपस्थित होते. तसेच प्रा. बनसोडे सर, यादव सर, पाचपुंड, फुलारी, शिंदे, दत्तू सर व क्रिडाशिक्षक शिक्षक नारायण जाधव तसेच इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक प्राध्यापक आर. बी. पवार उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी प्रतिनिधी राहुल बनकर यांनी केले तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी प्रा. सौ. सविता निळे यांनी केले. इंग्लीश स्कूल शाळेला भेट म्हणून माजी विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांना बसण्यासाठी १५ आरसीसी बँचेस भेट दिल्या. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विद्यार्थी संतोष कदम, राहुल बनकर, नाजमिन तांबोळी, दिनेश शिंदे, संतोष गायकवाड, राहुल माने देशमुख आदिंनी परिश्रम घेतले. यावेळी १९९९-२००० बॅचचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एलएलबी झाल्याबद्दल विजय काळे यांचा सन्मान

सुराज्य/नातेपुते : विजय रामचंद्र काळे नातेपुते यांनी नुकतेच एल. एल. बी. च्या कायदेविषयक शैक्षणिक पदवी मध्ये प्रथम श्रेणीने डिस्टिंक्शनसह यश मिळविले. त्याबद्दल अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती जननायक मामासाहेब पांढरे, उद्योजक संतोष (आबा) वायमोडे, तेजस पाटील, पप्पू दुधाळ यांच्या वतीने विजय काळे यांचा सत्कार करण्यात आला. विजय काळे यांचे इयत्ता १० वी व १२ वीचे शिक्षण नातेपुते येथील डॉ. बा. ज. दाते प्रशाला येथे झाले असुन पुढील शिक्षण कळंब (वालचंदनगर) , बारामती तसेच वकीलीचे शिक्षण प्रियदर्शनी लॉ कॉलेज फलटण येथे पुर्ण केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल राजकिय, सामाजिक, शैक्षणिक स्तरातुन त्यांचा सन्मान होत आहे.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ हे धार्मिक प्रेरणा देणारे स्थळ: चिकणे

सुराज्य/अक्कलकोट : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ हे एक धार्मिक प्रेरणा देणारे न्यास असून मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाने आध्यात्मिक बरोबरच सामाजिक सेवेला प्राधान्य दिले असल्याचे मनोगत नाशिक कारागृह उपअधिक्षक सचिन चिकणे यांनी यांनी व्यक्त केले. ते श्रीक्षेत्र अक्कलकोट श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्विस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी सचिन चिकणे हे बोलत होते. यावेळी मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, संकेत पिसे, मनोज निकम, एस. के. स्वामी, सतिश महिंद्रकर, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, सिध्दाराम कल्याणी, बाळासाहेब पोळ, अभियंता अमित थोरात, निखील पाटील, किरण पाटील, शिवराज स्वामी, प्रवीण घाडगे, सागर वाळवार यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

जिल्हाभर ऊसदर आंदोलनाचे लोण

दर जाहीर न करताच पेटवली धुराडी

जिल्हाधिकाऱ्यांनी बोलवलेल्या बैठकीकडे शेतकऱ्यांचे लक्ष

सुराज्य/सोलापूर

उसाला पहिली उचल २५०० हजार मिळावी या मागणीसाठी ऊसदर संघर्ष समितीने जिल्ह्यातील कारखान्यासमोर आंदोलनाचा धडाका लावला असून त्याला शेतकऱ्यांचा ही चांगला प्रतिसाद मिळत आहे. सलग तिसऱ्या वर्षी ऊसदर न ठरविताच कारखान्यांनी गाळप हंगाम सुरू केली आहेत. आतापर्यंत १४ कारखान्यांनी गळितास प्रारंभ केला असला तरी एकानेही ऊस दर जाहीर केला नाही. संघर्ष समितीच्या आक्रमक भूमिकेमुळे जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी सोमवारी सकाळी १० वाजता नियोजन भवन येथे सर्व सहकारी, खाजगी कारखानदार व ऊसदर संघर्ष समिती आणि प्रादेशिक सहसंचालक यांची संयुक्त बैठक बोलाविली आहे. या बैठकीतून काय तोडगा नियतो याकडे जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

'ओम गूळ'कारखान्यांच्या चेअरमनचा सत्कार

पंढरपूर तालुक्यातील आंबे येथील शिक्षक माजी आमदार दत्तात्रय सावंत यांनी काल मी 'मापात पाप' करणारी व्यक्ती नसून शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव दिला पाहिजे यासाठी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एकरकमी २५०० हजार रुपये देणार असल्याचे जाहीर करीत उसाचे वजन कुठे ही करून आणले तरी तो स्वीकारला जाईल असे जाहीर केले त्यामुळे संघर्ष समितीच्या वतीने आ. सावंत यांनी शेतकऱ्यांच्या मागणीची दखल येतली म्हणून सत्कार केला.

काल लोकमंगल तर आज शिंदे युनिट समोर गेटबंद आंदोलन

मागील २०१८-१९ यावर्षातील फेब्रुवारी महिन्यात ज्या शेतकऱ्यांनी ऊस दिला त्यांचे प्रतिटन ३०० रुपये प्रमाणे बिल मिळावे तर २०२१-२२ मध्ये परिसरातील इतर कारखान्यांनी २५०० हजार रुपये दिले परंतु लोकमंगल ने २००० हजार रुपयेच दिलेत त्यावर्षीचे थकित ५०० रुपये मिळावेत. चालू वर्षीची एकरकमी २५०० हजार जाहीर करा अशी मागणी करत भंडारकवटे येथील लोकमंगल कारखान्यांच्या गेटसमोर ठिय्या मारत शेतकऱ्यांनी आंदोलन केले यामध्ये दक्षिणसह मंगळवेढा व कर्नाटकातील शेतकरी सहभागी झाले होते. तर मंगळवेढा तालुक्यातील शेतकऱ्यांनी माचणूर येथे नागपूर -रत्नागिरी महामार्गावर रास्ता रोको केल्याने बराच वेळ वाहतूक ठप्प होऊन वाहनांच्या दुतर्फा लांबच लांब रांगा लागल्या होत्या. आज करकंब येथील विठ्ठलराव शिंदे युनिट नं २ च्या समोर गेटबंद आंदोलन करीत दर जाहीर करूनच गाळप सुरू करण्यात यावे अशी मागणी करीत गव्हाणी बंद करण्याचा प्रयत्न करीत असताना पोलीस व आंदोलकामध्ये मोठा संघर्ष बघायला मिळाला.

उपप्रादेशिक परिवहन कार्यालयासमोर ठिय्या

उसाची ओव्हरलोड वाहतूक करणाऱ्या वाहनावर कायदेशीर कारवाई करण्याच्या मागणीसाठी सोलापूर येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालय समोर संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी ठिय्या आंदोलन करून तात्काळ कारवाईची मागणी केली. यानुसार परिवहन विभागाने ऊस वाहतूक करणाऱ्या ओव्हरलड ट्रॅक्टरवर दंडात्मक कारवाई सुरू केली. ड्रायव्हर लायसन, टॅक्स, इन्शुरन्स पार्सिंग नंबर, पॉल्युशन आदीची कागदपत्रांची तपासणी सुरू केली आहे.

जर तोडगा निघाला नाही तर संघर्ष अटळ

सोमवारी होणाऱ्या बैठकीत ऊस दराचा तोडगा काढायचा असेल तर सर्व कारखान्याचे चेअरमन आणि एमडी उपस्थित राहिले पाहिजेत. जर ऊस दर संघर्ष समितीच्या तोंडाला पाणी पुसण्याचा प्रयत्न केला तर सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पोरांमधला भगतसिंग जागा झाल्याशिवाय राहणार नाही आज शेतकऱ्याचा पोरगा जिवावर उदार होऊन आंदोलनात सहभागी होत आहे कारण त्याच्या बापाचं गणित बिघडलं आहे. जर ऊस दराचा प्रश्न सुटला नाही सोलापूर जिल्ह्यामध्ये तांडव घडल्याशिवाय राहणार नाही याची दखल प्रशासनाने व सर्व कारखानदाराने घ्यावी.

– दीपक भोसले

अकलूजमध्ये धन्यवाद मोदीजी अभियान

सुराज्य/अकलूज

धन्यवाद मोदीजी अभियान अंतर्गत माळशिरस मंडलाची बैठक शिवरत्न नॉलेज सिटी शंकरनगर अकलूज येथे पार पडली सदर बैठकीस अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष हाजी एजाज देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळेस आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

प्रसंगी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी सर्वसामान्य जनतेसाठी विविध कल्याणकारी योजना कार्यान्वित करून समाजातील तळागाळातील घटकांपर्यंत योजनांचा लाभ पोहचवल्या बद्दल धन्यवाद मोदीजी अभियान राबविण्यात येत आहे त्याचा एक भाग म्हणून माळशिरस तालुक्यातील नागरिकांकडून पंतप्रधान मोदीजी यांना धन्यवादपूर्ण पोस्ट कार्ड पाठवण्यात आले.

सदर बैठकीस धन्यवाद मोदीजी अभियानाचे प्रदेश संयोजक अतिक खान, उपाध्यक्ष सलिम बागवान, सहसंयोजक हुजूर इनामदार, सोलापूर जिल्हा संघटन महामंत्री धैर्यशिल मोहिते-पाटील, अल्पसंख्यांक मोर्चा जिल्हाअध्यक्ष मुक्तार कोरबू, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष बाळासाहेब सरगर व तालुक्यातील इतर पदाधिकारी मान्यवर उपस्थित होते.

सुळेवाडी घाटातील रस्त्यावर खड्डेच खड्डे

रस्त्याचे काम का रखडवले प्रवाशांचा सवाल?

सुराज्य/पिलीव : माळशिरस तालुक्यातुन पंढरपूर -सातारा हा राष्ट्रीय महामार्ग जातो. हा एक मुख्य महामार्ग आहे कारण या रस्त्यावरुन साताऱ्यावरुन पंढरपूर ला भाविक मोठ्या संख्येने जातात तसेच सोलापुरला सुध्दा प्रवासी मोठ्या संख्येने जातात. रात्र दिवस हया महामार्गाने कायमस्वरुपी प्रवाशयांची रहदारी असते. हा महामार्ग झाल्या मुळे खरेतर प्रवशयांची चांगली सोय झाली आहे.

पण सुळेवाडी येथील घाटातील पुर्वी असणाऱ्या डांबरी रस्त्यावर गुडघ्या एवढे मोठ मोठे खड्डे च खड्डे पडले आहेत. खरेतर घाटातील रस्ता चांगला व सुरक्षित असणे आवश्यक असते कारण घाटात अपघात, चोरी, लुटमाऱ्या होतात या घाटात अनेकवेळा असे प्रसंग घडले आहेत. हा घाट धोकादायकच आहेच त्यामुळे याठिकाणी रस्ता चांगला असणे आवश्यक असताना संपूर्ण घाटात रस्त्याची अवस्था बिकट आहे. त्यामुळे वाहनधारकांना आपला जिव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. रात्री अपरात्री खराब रस्त्यामुळे चोरी, लुटमारीला वाव मिळत आहे. या घाटातील रस्ता का झाला नाही असा प्रश्न प्रवाशयामधुन विचारला जात आहे. हा घाट वनविभागाच्या हद्दीत आहे असे बोलले जात आहे मग सातारा हद्दीत वनविभागाच्या हद्दीतील रस्तयाचे काम झाले आहे मग सोलापूर हद्दीतील काम का झाले नाही. हे काम राष्ट्रीय महामार्ग म्हणजे च केंद्र शासनाच्या अखत्यारीत आहे वनविभागावर सुध्दा केंद्र सरकारचे असो अगर राज्य शासनाचे नियंत्रण असो मग धोकादायक घाटातील च रस्ता का होत नाही असा प्रश्न नागरीक व प्रवाशयामधुन विचारला जात आहे.

पंढरपुर-सातारा हया महामार्गाचे लोकार्पण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले पण अजुनही वनविभागाच्या हद्दीत, तसेच अनेक ठिकाणी पुलांची तसेच रस्त्याची कामे अनेक ठिकाणी अदयापही अपुर्णच आहेत, मग ही कामे पुर्ण कधी होणार हा खरा अनुत्तरित प्रश्न आहे.

विनाअनुदानित शिक्षकांचे आझाद मैदानावर आंदोलन

सुराज्य/विरवडे

गेल्या वीस वर्षापासून विनावेतन काम करणारे शिक्षक १० ऑक्टोबर २०२२ पासून आझाद मैदानामध्ये आंदोलन करत आहेत. ज्ञानदानाचे पवित्र काम करणारे शिक्षक आज आपल्या हक्कासाठी गेल्या १८ दिवसापासून आझाद मैदानामध्ये लढत आहेत. ऐन दिवाळीमध्ये शिक्षक आपल्या मुलांबाळासह आझाद मैदानामध्ये *काळी दिवाळी* साजरी केली. परंतु शासन काही दखल घेत नाही म्हणून शिक्षक समन्वय संघाचे हे आंदोलन तीव्र रूप धारण करणार असल्याचे शिक्षक समन्वय संघाच्या समन्वयक यांनी सांगितले.

दिवाळी हा सण भारतीय संस्कृतीमध्ये महत्त्वाचा सण आहे. हा सण प्रत्येक जण आपल्या परिवारासोबत साजरा करण्याच्या प्रयत्नात असतो.

> अनेक शिक्षक बांधव मोलमजुरी, हॉटेलमध्ये काम करतात, काही दुसऱ्यांच्या शेतामध्ये कामाला जातात, काही भाजीपाल्यांचा व्यवसाय करतात. ज्ञानदानाचे पवित्र काम करणाऱ्या शिक्षकांवर पुरोगामी महाराष्ट्रामध्ये अशी वेळ येणं हे महाराष्ट्राचं आणि महाराष्ट्रातील शिक्षणाचं दुर्दैव समजाव का??
>
> – रमेश जगताप, समन्वयक

मात्र, राज्यातील अंशतः अनुदानित शिक्षकांनी आपली दिवाळी चटणी भाकरी खाऊन आझाद मैदानात साजरी केली. जोपर्यंत आपल्या मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत आम्ही आझाद मैदान सोडणार नाही या भूमिकेवर राज्यभरातील शिक्षक ठाम आहेत. जिल्ह्यातील विनाअनुदानित शाळा -१५० आहेत तर अंशतः अनुदानित शाळा-४०० आहेत.

पिलीव येथे स्वच्छता अभियान

सुराज्य/पिलीव : माळशिरस तालुक्यातील पिलीव व परीसरात डॉ धर्माधिकारी प्रतिष्ठान मार्फत श्री समर्थ बैठक परिवाराच्या वतीने महात्मा गांधी जयंती पासुन पिलीव नगरीतील गल्ली बोळात स्वच्छता अभियान राबविले जात आहे.

या अभियानामध्ये सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, लोकप्रतिनिधी, विविध खात्याचे शासकीय अधिकारी, विविध संस्थाचे पदाधिकारी, तसेच पिलीव, झिंजेवस्ती, कुसमोड, बचेरी, सुळेवाडी, चांदापुरी, या भागातील समर्थ बैठकीमधील सदस्य सहभागी होत आहेत.

संघ परिवारातर्फे नवोदित गायक फुलारींचा सत्कार

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट ग्राहक पंचायत आणि संघ परिवाराकडून झी कन्नड सारेगमप लिटल चॅम्प स्पर्धेसाठी निवड झालेला तालुक्यातील तोळणूर गावचा नवोदित गायक रेवणसिध्द फुलारी आणि संगीतशास्त्र विषयात एम. ए. पदवी संपादन केलेले आदित्य जोशी व मयूर स्वामी यांचा जोशी भोजनालय येथे यथोचित सत्कार करून त्यांना पुढील उज्वल यशासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

याप्रसंगी रवींद्र जोशी, प्रशांत केसकर, अभिजित लोके, अभय शेटे, महेश वागदरे, शांतप्पा कलबुर्गी, प्रशांत शिंपी, शिवशंकर कुंभार, ओंकार पाठक, शरणप्पा फुलारी, अक्षय पाठक आदि उपस्थित होते.

सुराज्य सोलापूर
Classified

विवाह विषयक

● सर्व जाती धर्मातील प्रथम वधु/वर, विदुर, विधवा, घटस्फोटीत, आंतरजातीय, शासकीय/निमशासकी भरपूर स्थळे उपलब्ध. एकदाच नोंदणी करा लग्न जमेपर्यंत स्थळं उपलब्ध करुन दिले जातील.
श्री तुळजाभवानी वधु-वर सुचक केंद्र, तुळजापूर.
संपर्क : 7387906921
(121122)

पाहिजे

● श्री. तुळजाभवानी वधु-वर सुचक केंद्र, तुळजापूर येथील कार्यालयात १ स्मार्ट लेडीची आवश्यकता (फोनवर माहिती सांगण्यासाठी) आहे. शिक्षण किमान १२ वी आवश्यक, अपेक्षित पगार दिला जाईल. गरजूंनी संपर्क साधावा.
श्री तुळजाभवानी वधु-वर सुचक केंद्र, तुळजापूर.
संपर्क : 8378851719
(261022)

सोलापूर जिल्ह्यातील शिक्षकांचाही मोठा सहभाग

शावरी यांनी फराळ कार्यक्रमातून जोडला ऋणानुबंध

मैंदर्गी येथे एम.एस. युथ फाउंडेशनतर्फे फराळ कार्यक्रम

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी शहरात गेल्या अनेक वर्षांपासून एम एस युथ फाउंडेशनचे संस्थापक महेश शावरी परिवार हे अनेक सामाजिक, शैक्षणिक व राजकीय उपक्रमाच्या माध्यमातून समाजाशी नाळ जोडताना दिसून येत आहेत. यामुळेच आज मैंदर्गी शहराच्या शिवचलेश्वर च्या पुण्यनगरीत मैंदर्गी मठाचे श्री ष ब्र नीलकंठ शिवाचार्य महास्वामी व नागणसुर मठाचे श्री ष ब्र श्रीकंठ शिवाचार्य महास्वामी यांच्या दिव्य सानिध्यात श्री गुरु संस्थान हिरेमठ, मैंदर्गी येथे नागरिकांना फराळ कार्यक्रम घेण्यात आला.

एम एस युथ फाउंडेशनचे संस्थापक तथा समाजसेवक महेश शावरी यांनी ऋणानुबंध जपण्यासाठी दिवाळी फराळाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या फराळ कार्यक्रमास शहरातील नागरिक ही भरभरुन प्रतिसाद देताना दिसून आले. यावेळी सर्व उपस्थित मान्यवरांचे शावरी परिवार तर्फे यथोचित सन्मान करुन स्वागत करण्यात आला. यावेळी मैंदर्गी शहर व परिसरातील नागरिक, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहून फराळाचा आस्वाद घेत एम एस फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष महेश शावरी यांना भरभरुन शुभेच्छा दिल्या. जवळपास ३ हजार नागरिकांनी या फराळ कार्यक्रमाला उपस्थित राहून फराळाचा आस्वाद घेतला. एम एस फाउंडेशन च्या फराळ कार्यक्रमामुळे मैंदर्गी नागरिकांची दिवाळी मात्र गोड झाल्याचे नागरिकामधून दिसून आला. या फराळ कार्यक्रमाला मैंदर्गी चे ज्येष्ठ नेते फजले रहेमान शाब्दी, सुप्रसिध्द गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टदार उमरशा मकानदार, सुरेश दिवटे, मा. नगरसेवक किरण केसूर, समाजसेवक सुरेश नागुर, भाजपा महिला आघाडीचे तालुकाध्यक्ष सुरेखा होळीकट्टी, नीलकंठ मेंथे, बसवराज होळीकोट्टी, राजशेखर मसुती, अँड. विश्वनाथ पाटील, जैनुद्दीन हारकुड, बसवराज गोब्बूर, शिवचलप्पा पुजारी, महादेव आलुरे, दयानंद बमनळळी, बाबु बाजारमठ, लुकडे परिवार, पाटील परिवार यांच्यासह मैंदर्गी येथील विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा फराळ कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सूर्यकांत शावरी, मलकण्णा जनगुंडी, काशिनाथ जकापुरे, दिलीप शावरी, राज शावरी, दत्ता चव्हाण, शंकर हुग्गी, सुरेश झळकी, संजय चांबार, रमेश चिक्कळी, शरणप्पा तळीकर यांच्या सह आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन बाबू बाजारमठ यांनी केले तर आभार राज शावरी यांनी मानले.

गुजरात सरकारची खेळी

निवडणूक जाहीर होण्यापूर्वी समान नागरीचा निर्णय

✔ सुराज्य/गुजरात

गुजरातमधील सत्ताधारी भाजपने राज्यातील विधानसभा निवडणूक जाहीर होण्यापूर्वी मोठी खेळी केली आहे. गुजरात सरकारची कॅबिनेट बैठक आज पार पडली. या बैठकीत समान नागरी कायदा लागू करण्यासंदर्भात एक समिती स्थापन करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे.

कॅबिनेटने समिती स्थापन करण्याचे सर्वाधिकार मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांना दिले आहेत. पटेल जी समिती स्थापन करतील ती समिती समान नागरी कायदा लागू करण्यासंदर्भातील शक्यतांची तपासणी करेल. यासाठी विविध मुद्यांचा अभ्यास केला जाईल. उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली जाईल.

गुजरात सरकारच्या गृहमंत्र्यांनी समान नागरी कायद्याच्या शक्यतांची तपासणी केली जात आहे. यासाठी समिती स्थापन करण्यात येणार असल्याचं मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी म्हटले होते. गुजरातमध्ये देखील उत्तराखंडच्या धर्तीवर उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येणार आहे.

गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी ट्विट करुन राज्यात समान नागरी कायदा लागू करण्यासंदर्भातील शक्यतांची तपासणी करण्यासाठी, त्याचा ड्राफ्ट बनवण्यासाठी सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली उच्च स्तरीय समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आल्याचं ते म्हणाले.

उत्तराखंडमध्ये निवडणूक होण्यापूर्वी समान नागरी कायदा लागू करण्यासंदर्भात आश्वासन देण्यात आले होते. उत्तराखंडमध्ये भाजप सरकार आल्यानंतर समान नागरी कायदा लागू करण्यात आला होता. गुजरातमध्ये निवडणूक १ किंवा २ नोव्हेंबरला जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यापूर्वीच भाजपकडून समान नागरी कायद्यासंदर्भात मोठी खेळी करण्यात आली आहे.

समान नागरी कायदा हा विषय नेहमी भाजपच्या अजेंड्यावर राहिलेला आहे. १९८९ च्या लोकसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यात भाजपने त्याचा उल्लेख केला होता. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत देखील त्याचा समावेश होता. समान नागरी कायदा येत नाही तोपर्यंत स्त्री पुरुष समानता येऊ शकत नाही, असा भाजपचा विश्वास आहे.

समान नागरी कायदा काय आहे

समान नागरी कायद्यानुसार लग्न, घटस्फोट, मुलांना दत्तक घेणे, संपत्तीचं वाटप यासाठी सर्व नागरिकांसाठी एकच कायदा, एकच नियम असावा. भारतात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला तो नियम लागू असेल. ती व्यक्ती कोणत्याही धर्म किंवा जातीची असली तरी तिच्यासाठी वरील बाबींसाठी एकच कायदा असेल. ज्या राज्यात समान नागरी कायदा लागू होतो तिथं लग्न, घटस्फोट, जमीन, संपत्ती याच्या वाटपासाठी एक कायदा लागू होतो.

तीन हजार नव्या कॅमेऱ्यांची मध्य रेल्वेवर करडी नजर

✔ **सुराज्य/मुंबई** : प्रवाशांची सुरक्षा अधिक भक्कम करण्यासाठी मध्य रेल्वेच्या मुंबई विभागातील रेल्वे स्थानकांवर अत्याधुनिक दर्जाचे नवीन तीन हजार सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्यात येणार आहेत. यामध्ये काही जुन्या कॅमेऱ्यांच्या बदल्यात नवीन कॅमेरे बसवण्यात येतील. निर्भया योजनेंतर्गत हे कॅमेरे मार्च २०२३ पर्यंत बसवण्यात येणार असल्याचे मध्य रेल्वे सुरक्षा दलाकडून सांगण्यात आले. त्यामुळे प्रवाशांची सुरक्षा अधिक भक्कम होणार आहे.

दक्षिण कोरियात चेंगराचेंगरीत १२० जणांचा मृत्यू

✔ **सुराज्य/सेऊल** : 'हॅलोविन' साजरा करण्यासाठी चिंचोळ्या रस्त्यावर प्रचंड गर्दी उसळल्यामुळे झालेल्या चेंगराचेंगरीत किमान १२० जणांचा मृत्यू झाला आहे. धक्कादायक बाब म्हणजे यात सुमारे १०० जण जखमी झाले असून काही डझन लोकांना हृदयविकाराचा धक्का बसल्याची माहिती समोर आली आहे. इतिवोन मार्गावर ही दुर्घटना घडल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

हृदयविकाराचा झटका आलेल्यांचा आकडा मोठा असल्याचे समजते. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार या रस्त्यावरील एका बारमध्ये अज्ञात सेलिब्रेटी आल्याची अफवा पसरल्यामुळे गर्दी उसळली. मात्र, याला अधिकृत दुजोरा मिळू शकलेला नाही.

'वंदे भारत एक्सप्रेस' पुन्हा दुर्घटनाग्रस्त

✔ **सुराज्य/अहमदाबाद** : गुजरातमध्ये पुन्हा एकदा सेमी हाय स्पीड ट्रेन 'वंदे भारत एक्स्प्रेस' दुर्घटनाग्रस्त झाली. ही दुर्घटना वळसाडच्या अतुल रेल्वे स्टेशनवर झाली. 'वंदे भारत एक्स्प्रेस' समोर एक गाय आली. गाय ट्रेनला धडकल्याने एक्स्प्रेसचा पुढचा भाग तुटला, त्यामुळे ट्रेनमधील पाण्याच्या व्यवस्थेवर देखील परिणाम झाल्याचे सांगण्यात आले होते. रेल्वे विभागाने या संदर्भात माहिती दिली आहे. मुंबई सेंट्रलवरुन 'वंदे भारत एक्स्प्रेस' गांधीनगरला जात होती. अतुल स्टेशन रेल्वे स्टेशनवर सकाळी ८ वाजून १७ मिनिटांनी ही ट्रेन दुर्घटनाग्रस्त झाली. त्यामुळे एक्स्प्रेस १५ मिनिटे थांबवावी लागली. रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार ट्रेनचा पुढील भाग तुटला आहे. याशिवाय दुसरं नुकसान झाले नाही. 'वंदे भारत एक्स्प्रेस' ट्रेन वळसाडच्या अतुल रेल्वे स्टेशनवरुन जाताना एक गाय अचानक समोर आली. त्यामुळे ट्रेनचा पुढील भाग दुर्घटनाग्रस्त झाला.

कोरोनाच्या 'एक्सबीबी'चा वेगाने प्रसार

✔ **सुराज्य/मुंबई** : सिंगापूर आणि अन्य देशांमध्ये आढळलेला 'एक्सबीबी' हा कोरोनाचा नवीन विषाणू राज्यातही आढळला आहे. राज्यात या विषाणूचे ३६ रुग्ण आढळले. त्यापैकी २१ रुग्ण हे पुण्यातील असून ठाण्यात १० रुग्ण आढळले. परदेशात आढळलेल्या 'एक्सबीबी' या नव्या कोरोना विषाणू प्रकाराचा राज्यात झपाट्याने प्रसार होत आहे.

आतापर्यंत राज्यात त्याचे ३६ नवीन रुग्ण आढळले असून त्यापैकी २१ रुग्ण पुण्यातील, १० रुग्ण ठाण्यातील, नागपूरमध्ये दोन, तर अकोला, अमरावती, रायगड येथे प्रत्येकी एक रुग्ण आढळला. मुंबईत अद्याप या विषाणूचे रुग्ण आढळले नसले तरी प्रसार पाहता मुंबईलाही आता 'एक्सबीबी' धोका असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

ठाकरेंचा अजून एक मोहरा सोमय्या यांच्या रडारवर

✔ सुराज्य/मुंबई

मुंबईच्या माजी महापौर आणि शिवसेना (ठाकरे गट) नेत्या किशोरी पेडणेकर आणि त्यांचा मुलगा साईनाथ पेडणेकर यांनी खोटी कागदपत्रे दाखवून झोपू योजनेत (एसआरए) घोटाळा केल्याचा आरोप भाजपचे नेते किरीट सोमय्या यांनी केला आहे. या सगळ्या घोटाळ्याची मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेमार्फत (EOW) चौकशी व्हावी, अशी मागणी सोमय्या यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. त्यामुळे आता फडणवीसांनी एसआरए घोटाळ्याच्या चौकशीला मान्यता दिल्यास ठाकरे गटाच्या मुंबईतील प्रमुख नेत्यांपैकी एक असलेल्या किशोरी पेडणेकर मोठ्या अडचणीत सापडण्याची शक्यता आहे.

किरीट सोमय्या यांनी रविवारी मुंबईत पत्रकार परिषद घेऊन या कथित घोटाळ्याच्या चौकशीची मागणी केली. यासंदर्भात मरिनड्राईव्ह पोलिसांकडून चौकशी सुरु आहे. तर केंद्रातील कंपनी मंत्रालयने यासंदर्भात सत्र न्यायालयात तक्रार दाखल केली आहे. याशिवाय, एसआरएच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनीही याप्रकरणाची चौकशी सुरु झाली आहे.

किशोरी पेडणेकर यांनी कोविड काळात केलेला भ्रष्टाचार आणि बेनामी संपत्तीची चौकशी आर्थिक गुन्हे शाखेने करायला पाहिजे. मी तशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. ते ही मागणी मान्य करतील, अशी आशा असल्याचे किरीट सोमय्या यांनी म्हटले.

खळबळजनक घटना -

गारवा बिर्याणीच्या मॅनेजरची निर्घृण हत्या

✔ सुराज्य/पुणे

पुण्यात गुन्हेगारी सामान्यांना जगून देणार नाही अशी परिस्थिती झाली आहे. शनिवारी मध्यरात्री १२ वाजता गारवा बिर्याणीच्या मॅनेजरला अडवून धायरी येथे त्याची हत्या करण्यात आली. काम संपल्यानंतर दुचाकीवर घरी जात असताना अज्ञातांनी डोक्यात वार करुन त्याची हत्या केली. हत्या करणारे आरोपी फरार असल्यामुळे ही हत्या का झाली याचं कारण अद्याप कळू शकलेले नाही.

भरत भगवान कदम (वय २४, रा. धायरेश्वर प्राईड, मतेनगर, धायरी, पुणे) असे हत्या झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी त्याचा भाऊ प्रकाश भगवान कदम यांनी सिंहगड रोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

तोट्यातील मार्ग बंद करण्याचा पीएमपी'चा विचार

✔ सुराज्य/पुणे

पुणे महानगर परिवहन महामंडळाचे (पीएमपी) नवनियुक्त अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालकांनी महामंडळाचे आर्थिक गणिते सुधारण्यासाठी पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या हद्दीबाहेर जाणारे तोट्यातील मार्ग बंद करण्याचे संकेत दिले आहेत. त्याशिवाय, गर्दीच्या वेळी विनातिकीट प्रवास करणाऱ्यांना आळा घालण्यासाठी आणि आर्थिक नुकसान टाळण्यासाठी बसमध्ये दोन वाहक नियुक्त करण्याची चाचपणी सध्या केली जात आहे. पुढील काही दिवसांत याबाबतचा अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवडसह जिल्ह्यात 'पीएमपी'च्या सध्या अंदाजे एक हजार ६०० बस मार्गावर धावतात. मात्र, गर्दीचे मार्ग आणि बसची वारंवारिता याची सांगड नसल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत. दुसरीकडे गर्दीचा फायदा घेऊन अनेक प्रवासी विनातिकीट प्रवास करतात. या दोन्हीवर तोडगा काढण्यासाठी आता प्रशासनाकडून एका बसमध्ये दोन वाहक नेमण्यावर विचार सुरू आहे. यामुळे महामंडळाला होणारे नुकसान कमी होण्याची शक्यता आहे.

जम्मूत दरड कोसळली; चौघांचा मृत्यू

✔ **सुराज्य/श्रीनगर** : जम्मू काश्मीरच्या किश्तवार जिल्ह्यामध्ये दरड कोसळल्याने झालेल्या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला आहे.

'रॅटल' जलविद्युत प्रकल्पात ही दुर्घटना घडली आहे. या घटनेत सहा लोक गंभीररित्या जखमी झाले आहेत. जलविद्युत प्रकल्पातील बचावकार्य पूर्ण झाले आहे. या परिसरात चार जणांचे मृतदेह सापडले आहेत. सहा जखमी लोकांना ढिगाऱ्यातून बाहेर काढण्यात यश आले आहे, अशी माहिती किश्तवारचे उपायुक्त देवांश यादव यांनी दिली आहे.

ॲमेझॉनचे सर्वांत मोठे केंद्र ठाण्यात

✔ सुराज्य/ठाणे

विविध प्रकल्प गुजरातला पळवले जात असल्याचा वाद सुरू असतानाच, मेझॉन समूहातील एका कंपनीचे देशातील सर्वांत मोठे केंद्र ठाण्यात उभारले जाणार आहे. त्यासाठी 'ॲमेझॉन वेब सर्व्हिसेस' या कंपनीने एक हजार ८४० कोटी रुपयांची जागा खरेदी केली असून, त्यापोटी तब्बल १३० कोटींचे मुद्रांक शुल्क भरल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

ठाण्याच्या घोडबंदर रस्त्याचा निवासी व व्यावसायिकदृष्ट्या जोमाने विकास होत आहे. घोडबंदर रस्त्याच्या माजीवाडा ते गायमुखदरम्यान दुतर्फा मोठमोठी निवासी संकुले उभी राहत आहेत. याच निवासी संकुलांच्या पार्श्वभूमीवर पातलीपाडा-डोंगरीपाडा परिसरात हिरानंदानी इस्टेट भागात कंपन्यांची मोठी कॉर्पोरेट कार्यालये येऊ घातली आहेत. घोडबंदर रस्त्याला समांतर असलेल्या कोलशेत मार्गावरील जुन्या औद्योगिक जमिनींचे आता मोठ्या टाऊनशिपमध्ये रूपांतरण झाले आहे. यामध्येच बाळकूमचादेखील समावेश होतो. स्थावर मालमत्ता क्षेत्रातील मोठ्या कंपन्यांच्या टाऊनशिप तेथे आल्या आहेत. अशा सर्व विकासित क्षेत्राने घेरलेल्या भागात ॲमेझॉनने ही मोक्याची जागा शोधली आहे.

'ॲमेझॉन वेब सर्व्हिसेस' यांनी बाळकूम पाडा येथील ६० एकर जागा एक हजार ८४० कोटी रुपये खर्चून विकत घेतली आहे. अनंता लँडमार्क्स या कंपनीकडून ही जागा खरेदी करण्यात आली असून, ही कंपनी कल्पतरू समूहाचा भाग आहे. या जमिनीवर ॲमेझॉनकडून डेटा सेंटर उभे केले जाणार आहे', असे सूत्रांनी सांगितले.

पुण्यात थरार -

माझे माशाचे गिऱ्हाईक पळवतो का? तुला मारुनच टाकतो

✔ **सुराज्य/पुणे** : पुण्यातील खेड शहरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. माझे माशाचे गिऱ्हाईक पळवले, याच्या रागातून दोघांनी शेजारी असणाऱ्या दुकानाच्या मालकावर मासे कापायच्या कोयत्याने सपासप वार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. तुला मारूनच टाकतो, तुला जिवंत ठेवत नाही, असे म्हणत त्या दुकानदारावर वार केले आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

आमन मोमीन व सुफियान मोमीन उर्फ दुध्या (रा. शिंपीआळी, राजगुरु नगर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या दोघांचे नाव आहे.

सोयल रफिक मोमीन (वय २६ वर्षे, रा. मोमीन आळी, राजगुरुनगर) हा यात गंभीर जखमी झाला आहे. शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास ही घटना घडली असून या प्रकरणी दोघांवर गुन्हा दखल करण्यात आला आहे.

फिलिपाईन्सच्या वादळात ४७ जणांचा बळी

✔ सुराज्य/मनिला

फिलिपाईन्स येथे उष्णकटिबंधीय वादळ 'नाल्गा'मुळे झालेल्या मुसळधार पावसामुळे अचानक आलेला पूर आणि भूस्खलनामुळे ४७ जण मृत्युमुखी पडले. फिलिपाईन्सच्या दक्षिण भागास मोठा फटका बसला. अद्याप सुमारे ६० ग्रामस्थ बेपत्ता झाल्याची भीती आहे. भूस्खलनामुळे खडक, झाडे व मातीच्या ढिगाऱ्यात ते गाडले गेल्याची भीती अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

बगदादममध्ये स्फोट; १० जणांचा मृत्यू

✔ सुराज्य/बगदाद

इराकच्या पूर्व बगदादमध्ये झालेल्या स्फोटात दहा लोकांचा मृत्यू झाला आहे.

या घटनेत २० पेक्षा जास्त लोक जखमी झाल्याची माहिती सुरक्षा आणि वैद्यकीय क्षेत्रातील सूत्रांनी दिली आहे. फुटबॉल स्टेडियमजवळ असलेल्या गॅरेजमध्ये आणि एका टँकरमध्ये हे स्फोट झाले आहेत.

ही स्फोटके गॅरेजमधील एका गाडीला बांधण्यात आली होती. या गाडीत झालेल्या स्फोटामुळे जवळच असलेल्या गॅस टँकरमध्येदेखील स्फोट झाला, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. या स्फोटात बळी पडलेल्यांपैकी बहुतेकजण स्टेडियममध्ये फुटबॉल खेळणारे खेळाडू होते. या स्फोटाच्या कारणांचा तपास सुरक्षा दलाकडून करण्यात येत आहे.

महाराणी एलिजाबेथचे १४ घोडे विकले

▶ अन् तब्बल साडे नऊ कोटी कमावले

✔ सुराज्य/लंडन

ब्रिटनचे महाराजा चार्ल्स तिसरे यांनी राणी एलिझाबेथचे १४ घोडे विकून १० लाख पाऊंड म्हणजेच सुमारे साडेनऊ कोटी कमावले आहेत. या महिन्याच्या सुरुवातीला अशी नोंद करण्यात आली होती की ८ सप्टेंबर रोजी राणीच्या मृत्यूनंतर चार्ल्सला राणीच्या ३७ घोड्यांपैकी एक भाग वारसा म्हणून मिळाला होता.

राणीला घोड्यांच्या शर्यतीची खूप आवड होती. जेव्हा ती फक्त चार वर्षांची होती, तेव्हा त्यांना पहिला घोडा विकत घेऊन देण्यात आला होता.

२०१३ मध्ये रॉयल एस्कॉट येथे गोल्ड कप जिंकणारी एस्टीमेट असलेली ती पहिली शासक बनली. किंग चार्ल्सने या आठवड्यात न्यूमार्केटमधील टॅटरसॉल विक्रीत घोडे विकण्याची आपल्या आईची परंपरा सुरु ठेवली, अशी माहिती 'ब्रिटीश वृत्तपत्र द सन'ने दिली आहे. त्यांनी एकूण १४ घोडे विकले.

विकल्या गेलेल्या घोड्यांमध्ये राणीच्या मृत्यूच्या दोन दिवस आधी गुडवुड जिंकलेल्या घोड्याचाही समावेश आहे. २०२० मध्ये, रॉयल एस्कॉट विजेत्या टॅक्टिकलच्या विक्रीवर १५०,००० पाऊंड मिळाले होते. या १४ घोड्यांनी चार्ल्स यांना एकूण १,०७५,५०० म्हणजेच सुमारे १० कोटी रुपये कमावून दिले.

एका शाही सूत्राने दिलेल्या माहितीनुसार, चार्ल्स यांच्याकडे असलेल्या घोड्यांची संख्या कमी करुनही त्यांची खेळाविषयी कुतूहल कायम राहील. कुटुंब आणि घोडदौड उद्योग यांच्यातील नाते कायम राहील. रॉयल एस्कॉटसोबतची परंपरा आणि संबंध पुढे चालू ठेवण्याची इच्छा आहे, असेही ते म्हणाले.

पुढील वर्षी राज्याभिषेक

ब्रिटनचा राजा चार्ल्स III चा राज्याभिषेक पुढील वर्षी ६ मे रोजी लंडनमधील वेस्टमिन्स्टर ॲबे येथे होणार आहे. राणी एलिझाबेथ द्वितीय यांचे गेल्या महिन्यात निधन झाल्यानंतर त्यांचा मुलगा चार्ल्स (७३) याला ब्रिटनचा राजा म्हणून घोषित करण्यात आले. बकिंगहॅम पॅलेसने दिलेल्या माहितीनुसार, कँटरबरीच्या आर्चबिशपने आयोजित केलेल्या राज्याभिषेक समारंभात चार्ल्स तिसरा हे अधिकृतपणे त्यांचा मुकुट बहाल केला जाईल.

रेल्वे हाऊसफुल्ल

दिवाळी संपल्यानंतर पुण्याला जाणाऱ्या आणि येणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी वाढली आहे. इंद्रायणी रेल्वे आल्यानंतर प्रवाशांची अशी झुंबड उडाली.

अनुकंपा नियुक्ती झेडपीच्या सभागृहातच झाली पाहिजे

अन्यथा पुन्हा भिक मांगो आंदोलन करणार

✔ सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषदेच्या अनुकंपा कर्मचाऱ्यांची नियुक्ती झेडपीच्या सभागृहातच झाली पाहिजे अन्यथा पुन्हा भीक मांगो आंदोलन छड ले जाईल असा इशारा लोकशासन आंदोलन पार्टीच्या वतीने जि.प.चे सीईओ दिलीप स्वामी यांच्याकडे निवेदनाद्वारे देण्यात आला आहे

जिल्हा परिषदेतील अनुकंपा भरतीची प्रक्रिया गेल्या एक महिन्यापासून रखडली आहे. याची कारणे वेगवेगळी सांगितली जात असली तरी उमेदवारांना पैशाची मागणी होत असल्यास पुन्हा भीक मागो आंदोलन करण्याचा इशारा लोकशासन आंदोलन पार्टीने दिला आहे. जिल्हा परिषदेच्या प्रशासन विभागाने अनुकंपा यादीवरील ११२ उमेदवारांना नियुक्ती देण्याची प्रक्रिया राबविली आहे. याबाबत संबंधित उमेदवारांकडून कागदपत्राची पूर्तता करून घेण्यात आली आहे. या उमेदवारांना दसऱ्याला नियुक्तीपत्रे दिली जातील, असे सांगितले गेले होते. पण दसऱ्याचा मुहूर्त लागला नाही. त्यानंतर दिवाळी पाडव्याचा मुहूर्त सांगण्यात आला, पण हाही मुहूर्त हुकला. त्यामुळे अनुकंपा उमेदवारांनी शुक्रवारी जि.प.चे सीईओ स्वामी यांची भेट घेऊन ही प्रक्रिया लवकर संपविण्याची मागणी केली. अनुकंपा उमेदवारांना नियुक्ती देण्यास होत असलेल्या टाळाटाळीबद्दल आता आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

सभागृहात घ्या सुनावणी...

अनुकंपा यादीवरील उमेदवारांना नियुक्ती देण्याची प्रक्रिया खुल्या सभागृहात पार पाडावी, अशी मागणी लोकशासन आंदोलन पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजू दिंडोरे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे. खुल्या सभागृहात नियुक्तीचे समायोजन केल्यामुळे पारदर्शकता राहील व झेडपीचे नाव उज्वल होईल. आरोग्य विभागाच्या बदल्यात ज्याप्रमाणे मुख्यालय दक्षिण व उत्तर तालुका बंद करून नियुक्त्या दिल्या, त्याप्रमाणे या नियुक्त्या देण्यात याव्यात. यामुळे इतर तालुक्यांना चांगले कर्मचारी मिळतील. यात आर्थिक उलाढाल झाल्यास पुन्हा भिक मागो आंदोलन करण्यात येईल, असा इशारा दिला आहे



आ. रणजितसिंह यांनी केली बंधाऱ्याची पाहणी

✔ सुराज्य/अकलूज : माळशिरस तालुक्यातील निरा नदीवरील गणेशगाव व संगम बंधारा तसेच भिमा नदीवरील वाफेगाव, मिरे व जांबुड येथील बंधाऱ्यांची पाहणी आ रणजितसिंह मोहिते पाटील यांनी केली. यावर्षी झालेल्या अतिरिक्त पावसामुळे बंधाऱ्यांचे भराव वाहुन जाणे, संरक्षक भिंत तुटणे, असे प्रकार घडले आहेत. त्याप्रमाणे पाणी आडवण्याच्या दृष्टीने बंधाऱ्यांच्या दरवाजांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. यासंदर्भात संबधित अधिकाऱ्यांशी चर्चा करुन बंधाऱ्यांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याच्या सुचना यावेळी आ. मोहिते पाटील यांनी दिल्या. यावेळी गणेशगाव, संगम वाफेगाव, मिरे, जांबुड भागातील शेतकरी, कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

साईसमर्थ दूध डेअरीतर्फे सभासदांना बोनसचे वाटप

✔ सुराज्य/पिलीव : माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील साई समर्थ दुध डेअरी तफे् सभासदांना १रुपया २५ पैसे प्रती लिटरप्रमाणे १३० सभासदांना दिपावलीनिमीत्त बोनसचे वाटप करण्यात आले तसेच १०० गोरगरीब नागरिकांना दिपावलीनिमीत्त चार जिवनावशयक वस्तुंचे व साडीचे वाटप करण्यात आले. यामध्ये २०२२ या वर्षात सर्वाधिक दुध घालणाऱ्या पहिल्या पाच सभासदांना बोनस म्हणून रोख रक्कम तसेच आकर्षक भेटवस्तू देण्यात आल्या. यामध्ये प्रथम क्रमांक (१) बापुराव केशव लेंगरे ३९,९१७ रपये व कपाट (२)गणेश लेंगरे २४, ९२७ व शोकेश, (३)अनिल लेंगरे १४,०९८ व कुलर, (४)विजय पिसे १२, ३१५ व मिक्स र(५) अशोक मदने ११,१८५ टेबल फॅन अशी सर्वाधिक दुध घालणाऱ्या सभासदांना रोख रक्कम व बक्षीसे देण्यात आली. १३० सभासदांना १ रुपया २५ पैशयाप्रमाणे एकुण चार लाख रुपये बोनस म्हणून वाटण्यात आले यामुळे सभासदांनची दिवाळी गोड झाली तर गावातील गोरगरीब १०० कुटुंबाना दिपावली निमित्त जिवनावशयक चार वस्तु तसेच साडीचे वाटप करण्यात आले. यावेळी तुषार लवटे, लक्ष्मण पवार,शहाजी लेंगरे, नाथा मदने, बाळासाहेब धायगुडे, महावीर धायगुडे, रामा पालखे, चेअरमन व संस्थापक मनोहर लवटे, धनाजी वाघ, संजय पाटील, दामोदर लोखंडे, नबाजी मदने, अनंता लेंगरे, कानट्कटर निखील सुळे, या दोन्ही कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिध्देश्वर पाटील होते. यावेळी प्रास्ताविक सहहयाक पोलीस निरीक्षक अनिल लवटे यांनी केले.

अपरिचित संस्थेतर्फे निराधारांसोबत दिवाळी साजरी

✔ सुराज्य/सोलापूर : अपरिचित सामाजिक संस्थेच्यावतीने निराधार मुलांसोबत व साठ गरीब कुटुंबांना फराळ देवुन दिपावली साजरी करण्यात आली. दिपावली हि नवचैतन्याची प्रकाशाची गोड धोड खावु खाण्याची दिपावली हिच दिपावलीची ओळख आहे. पण आज ही अनेक लोक आहेत कि त्यांना त्याच्या परिस्थिती मुळे दिपावली सण साजरी करणे मुश्किलच तेव्हा सण वार हे सर्वानी ऐकत्र येवुन एकमेकांच्या सुख:दुखात सहभागी होवून सण साजरे करावे ह्याचीच प्रेरणा देतात तेव्हा हिच प्रेरणा येवुन अपरिचित सामाजिक संस्थेच्या वतीने वंचितांन बरोबर राहून त्यांना फराळ व संसार उपयोगी धान्य देवुन दिपावली साजरा करण्यात आली. यंदाच्या वर्षी हि दिपावली निमित्त गुळवंची येथे १४ अनाथ बालकांचा सांभाळ करणारे संतोष सर यांच्या येथे मुलांना फराळ, फटाके, धान्य तसेच एका आजीला साडी हि भेट देण्यात येवून दिवाळी सण साजरा करण्यात आला. या कार्यक्रमावेळी सचिन तळेकर, संजय साळुंखे, अक्षय अंजीरखाने, रामेश्वर सुरवसे यांच्या समवेत साजरी करण्यात आली.

दिवाळी झाली आनंदाच्या शिधाची, दुकानदारांच्या मागे अद्याप किटकिट

सर्व्हर डाऊन, ऑफलाईन देखील वाटप होईना, दुकानासमोर रांगाच रांगा

✔ सुराज्य/सोलापूर

गोरगरिबांची दिवाळी गोड करण्यासाठी शिंदे फडवणीस सरकारने दिलेली दिवाळी भेट आनंदचा शिधा अद्याप लाभार्थ्यांना मिळाला नाही नियोजनाच्या अभावी मुळे कीट दुकानदारांपर्यंत पोहचला नाही मात्र दिवाळी झाली तरी देखील रेशन दुकानदारांच्या आनंदचा शिधाची कीट कीट संपली नाही. दिवाळी सरली तरी देखील दुकानासमोर रांगाच रांगा दिसत आहेत. त्यामध्ये सर्व्हर डाऊनचा फाटका आणि ऑफलाईन देखील वाटप होईन त्यामुळे दुकानदारांची डोके दुखी वाढली आहे. तर कीट न मिळाल्याने लाभार्थी वैतागले आहेत.

राज्य शासनाने दिवाळीच्या तोंडावर राज्यातील नागरिकांना गोड बातमी दिली दिवाळीसाठी शंभर रुपयांमध्ये साखर, तेल, चनाडाळ. आणि रवा अशा चार वस्तू जाहीर केल्या त्यामुळे सर्वसमान्याची दिवाळी आनंदाने जाणार म्हणून नागरिक खूश होते. आनंदाचा शिधा असे नामकरण शिंदे - फडणवीस सरकारने केले. प्रशासनाने कीट वाटपाचे नियोजने केले सोलापूर जिल्ह्यासाठी चार लाख तर शहरभागासाठी एक लाख वीस हजार कीट येणार होते. मात्र दिवाळी तोंडावर आली तरी कीट मधील साहित्य आलेच नाही तरी देखील मोठ्या दिमाखात कीट वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. दिवाळी होऊन दोन दिवस झाले अद्याप शहरात आणि जिल्ह्यात टिक वाटप झाले नाही शहरात फक्त ५० टक्के वाटप झाले असल्याचे समजते शहराच्या काही भागात हे कीट पोहचले नाही त्यामुळे शिधा दुकानदारांच्या मागे ग्राहकांची कीट कीट चालू आहे. कीट कधी येणार अशी विचारणा करत ग्राहक हेलपाटे मारत आहेत. तर ज्या दुकानात टिक आले आहे. पण टिक साहित्य पूर्ण नाही तर सर्व्हर डाऊन असल्याने वाटपास विलंब होत आहे. त्यामुळे शासनाने ऑफलाईन शिधा वाटपाचे आदेश दिले आहे. मात्र साहित्य कमी असल्याने ग्राहक कमी साहित्य असलेले कीट घेण्यास तयार नाही त्यामुळे दुकानदार वैतागले आहेत. परिणामी दिवाळी संपली तरी रेशन दुकानासमोर शिधा घेण्यासाठी रांगाच रांगा दिसत आहेत.

> शहरात तेल आणि चनादाळ आली नव्हती रविवारी दुपारी ३१४ तेलाचे कीट तर ४१६८ चणाडाळीचे पॅकेट आले आहे. रात्री सर्व ३१५ रेशन दुकानदारांपर्यंत पोहचले आहे. सोमवार पासून शहरातील शिधा वाटपाचे काम सुरू होऊन दोन दिवसात हे वाटप पूर्ण केले जाणार आहे. असल्याचे रेशन दुकानदार संघटनेचे जिल्हा प्रसिध्द प्रमुख नितीन पेंटर यांनी सांगितले.

शेतीचे पंचनामे करावेत अन्यथा आंदोलन

✔ सुराज्य/सोलापूर : गत काही दिवसापासून राज्यात पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या पिकाचे अतोनात नुकसान झाले असून शासनाच्या वतीने काही ठिकाणी पंचनामे सुरू करण्यात आल्या असून या नुकसान ग्रस्त पालेभाज्या फळभाज्या व कडधान्यांना नुकसान भरपाई मिळणार आहे.

माढा तालुक्यातील कोंढार भागामध्ये आणखीही काही भागांमध्ये पंचनामे झाली नसून नुकसान झालेल्या सर्व शेतकऱ्यांचे पंचनामे तातडीने करून या पंचनाम्यामध्ये केळी व इतर फळबागांचा समावेश करावा व त्यांनाही नुकसान भरपाई द्यावी अन्यथा माढा तालुक्याचे आमदार बबनराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली रस्त्यावर ते उतरून आंदोलन करणार असल्याचे जिल्हा सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी पशुसंवर्धन सभापती संजय पाटील भिमानगर कर यांनी आज घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये सांगितले.

वीरशैव लिंगायत प्रीमियर लीगच्या अध्यक्षपदी महेश बिराजदार

✔ सुराज्य/अक्कलकोट

वीरशैव लिंगायत प्रीमियर लीगच्या अध्यक्षपदी दर्गनहळळी चे महेश दादा बिराजदार यांची निवड झाली व त्याचबरोबर उपाध्यक्ष निखिल थोबडे व स्वागताध्यक्ष पदी सिध्दार्थ सालकी यांची निवड करण्यात आली. ह्या कार्यक्रमाची सुरुवात महात्मा बसवेश्वर महाराजांच्या मूर्तीस अभिवादन करून करण्यात आले. यावेळी महेश अण्णा कोठे, सुधीरजी खरटमल, अमोल बापू शिंदे, मनीष काळजे, बिज्जु अण्णा प्रधाने, संस्थापक अध्यक्ष केदारनाथ विराजमार, राजशेखर विजापूरे, ईरप्पा मामा सालक्की, डॉ. प्रकाश घटोळे, बसवराज सलगर, प्रा. गजानन धरणे, एन. डी. (मामा) जावळे, श्रीशैल बनशेट्टी, चन्नवीर चिट्टे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही निवड करुन शुभेच्छा देऊन सत्कार करण्यात आले. वीरशैव लिंगायत प्रतिष्ठानचे मार्गदर्शक व सल्लागार, संचालक आणि पदाधिकारी तसेच समाजबांधव मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गुरुनाथ निंबाळे यांनी केले.

मुस्लिम मराठी साहित्य संमेलन जानेवारीत होणार

✔ सुराज्य/सोलापूर : अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य परिषदद्वारे २८व २९ जानेवारी २०२३ ला नाशिकमध्ये होऊ घातलेल्या नवव्या अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी कामगारनेते तथा सामाजिक विचारवंत इरफान रशीद शेख यांच्या उपस्थित एक झूम मिटींग २८ रात्री ९ वाजता घेण्यात आली. हमामान खातेच्या अंदाजा नुसार नाशिक मध्ये जोरदार पाऊस व खराब हवामान असण्याची शक्यता असल्यामुळे डिसेंबर मध्ये होणारे मुस्लिम मराठी साहित्य संमेलन पुढे ढकलकत २८-२९ जानेवारी २०२३ मध्ये घेण्याचे ठरले आहे अशी माहिती नाशिकचे संयोजक डॉ. फारूक शेख यांनी दिली.

संमेलनापूर्वी यासाठी विविध स्पर्धाचं आयोजन करण्यात येत आहे. त्याचे विविध समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत, शहरातील दादासाहेब गायकवाड सभागृहात संमेलन होणार आहे यात लेखक गीतकार जावेद अख्तर, माजी कुलगुरू फैजान मुस्तफा, सिनेस्टार नसीरोद्दीन शहा, रज़ा मुराद यांना विशेष अतिथी म्हणून आमंत्रित करण्या बाबत व परिसंवादातील विषय, त्याचे वक्ते, स्मरणिका समिती स्थापन करणे, व आतापर्यंत चे सर्व माजी संमेलन अध्यक्षांना निमंत्रित करणे अशा महत्त्वचे विष्यावर सविस्तर चर्चा झाली.

संमेलनाच्या पूर्वतयारी बैठकीसाठी स्वागत अध्यक्ष इर्फान शेख, समितीचे प्रमुख डॉ. लियाकत नामोले, समितीचे सचिव अय्यूब नल्लामंदू, सहसचिव मुबारक शेख, उपाध्यक्ष डॉ. तांबोळी. खजीनदार हसीब नदाफ, सदस्य डॉ. युसूफ बेन्नूर, डॉ सुरय्या परवीन जहागीरदार, मजहर अल्लोळी, नाशिकचे डॉ. फारूक शेख, नागपूरहून जावेद कुरेशी, बीडचे कलीम अज़ीम, अरुण घोडेराव, व अनेक साहित्यप्रेमी उपस्थित राहून आपले मनोगत व्यक्त करत संमेलनात तन-मन -धनांनी सहकार्य करण्याची ग्वाही दिली. प्राचार्य फारुक शेख प्रास्ताविक केले, स्वागताध्यक्ष इरफान शेख विविध समित्यांचा आढावा घेतला, डा. नामोले नीं सुत्र संचलन करत आभार ही व्यक्त केले.

जिल्ह्यात रासपची पक्ष बांधणी करणार : हक्के

✔ सुराज्य/सोलापूर

राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आ. महादेव जानकर, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष काशिनाथ शेवते, मुख्य महासचिव ज्ञानेश्वर सलगर, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष संजय माने यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर जिल्ह्यामध्ये पक्ष बांधणी करण्यात येणार असून येणाऱ्या काळामध्ये राष्ट्रीय समाज पक्ष हा सर्व निवडणुका स्वबळावर लढणार आहे, असे प्रतिपादन जिल्हा संपर्कप्रमुख श्रीमंत हक्के यांनी केले आहे.

राष्ट्रीय समाज पक्ष सोलापूर जिल्हा पक्ष बांधणीकरिता जिल्ह्यामध्ये दोन जिल्हाध्यक्ष पदाची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा अध्यक्ष यांच्या कार्याच्या माध्यमातून जिल्ह्यातील सर्व तालुका आघाड्या नियुक्ती लवकरच जाहीर होणार असून पुढील निवडणुका राष्ट्रीय समाज पक्ष स्वबळावर लढणार आहे. सोलापूर विभाग जिल्हाध्यक्षपदी अशोक ढोणे तर पंढरपूर विभाग पंढरपूर विभाग जिल्हाध्यक्षपदी रणजीत सुळ यांची नियुक्ती पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष संजय माने यांनी केली आहे. राष्ट्रीय समाज पक्ष हा तळागाळापर्यंत पोहोचलेला पक्ष असून कार्यकर्त्यांना पुढील दिशा देण्याकरिता बैठक व मेळाव्याच्या आयोजन करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. येणाऱ्या काळामध्ये सर्व तालुक्यांमध्ये बैठकीचे नियोजन करण्यात आले आहे. येणाऱ्या ग्रामपंचायती, नगरपालिका, नगर परिषद, महानगरपालिका, जिल्हा परिषद निवडणुका राष्ट्रीय समाज पक्ष स्वबळावर लढणार आहे. प्रत्येक जागेवर लढेंगे और जितेंगे हे सूत्र अवलंबून पक्षाची ध्येयधोरणे आखली जाणार आहे. रासप उमेदवारानी यापूर्वी निवडणुकींमध्ये अनेक जागेवर दुसऱ्या क्रमांकाची मते घेतली आहेत, अशा ठिकाणी विशेष प्रयत्न केले जाणार आहे. राज्यात अनेक ठिकाणी जिल्हा परिषद सदस्य, पं. स. सदस्य, सभापती, नगरसेवक, नगराध्यक्ष, आमदार आदि पदावर रासपचे उमेदवार निवडुन आले आहेत. त्याच धर्तीवर सोलापुरातुन रासपचे उमेदवार निवडुन आणण्याकरिता सर्व ताकद अवलंबली जाणार आहे. प्रसंगी वरिष्ठांच्या आदेशाने स्थानिक ठिकाणी युतीबाबत निर्णय घेतला जाईल. तरी सर्व जिल्हातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जानकर साहेब यांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी कार्यरत राहावे असे हक्के यांनी म्हटले आहे.

शेतकरी कन्या पुजाची कमाल, अमेरिकेच्या हार्वर्ड विद्यापीठात मिळवले स्थान

अस्पायर लीडर प्रोग्रॅममध्ये करमाळ्याची पूजा गुंजाळ

✔ सुराज्य/सोलापूर

अमेरिकेतील सर्वात जुने आणि प्रतिष्ठित हार्वर्ड विद्यापीठाच्या अस्पायर लीडर प्रोग्रॅम मध्ये सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यातील भगतवाडीतील पूजा शंकर गुंजाळ हिची निवड झाली आहे.

जगभरातून निवड करण्यात आलेल्या ३६४ प्रतिनिधींमध्ये पूजा गुंजाळ हिची यशस्वीपणे निवड करण्यात आली. अत्यंत कठीण अशा पाच वेगवेगळ्या टप्प्यानंतर ही निवड झाली आहे. त्यामुळे छोट्याशा गावातील मुलगी अमेरिकेतील विद्यापीठात स्वतःचे कर्तृत्व सिध्द करणार आहे.

यामध्ये अमेरिका, रशिया, चिली, नायजेरिया इत्यादी देशांच्या प्रतिनिधींसोबत भारताचे प्रतिनिधित्व पूजा गुंजाळ करणार आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्रातून ती एकमेव आहे. पूजाचे वडील शंकर गुंजाळ यांची आर्थिक परिस्थिती फार बिकट असताना मुलीचे शिक्षण पूर्ण केले. शंकर गुंजाळ हे भूमिहीन शेतकरी असून त्यांनी पूजाच्या शिक्षणाला काहीच कमी केली नाही. पूजाचे प्राथमिक शिक्षण हे भगतवाडी शाळेत झाले तर माध्यमिक शिक्षण हे शहाजीराजे उमाजी राजे भोसले हायस्कूल जिंती येथे झाले. महाविद्यालयीन शिक्षण हे शारदानगर बारामती येथे झाले.

> गेल्या अनेक वर्षापासून महिलांसाठी मासिक पाळी या विषयावर मी काम करीत आहे. त्यांच्या संदर्भात असणाऱ्या समस्या आणि महिलांच्या आरोग्या निमित्त उद्भवणाऱ्या प्रत्येक गोष्टींवर मी बारकाईने अभ्यास करत आहे. पुण्यातील 'समाज बंद' या संस्थेच्या माध्यमातून मी सध्या सांगली जिल्ह्यात स्थित महिलांसाठी काम करत आहे. 'आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्ट' कडून मला ऑफर आली आणि मी या प्रोग्रामिंग साठी जॉईन झाले. या सर्व यशामागे आई मंदा गुंजाळ व वडील शंकर गुंजाळ यांचे प्रमुख योगदान आहे. ज्यांनी खंबीरपणे कायम मला प्रोत्साहन दिले.
>
> - पुजा गुंजाळ